१८५५

स्वा. वीर सावरकरांच्या जयंति निबंध स्पर्धेतील

# चार यशस्वी निबंध



REFBK-0008525

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. १००४

मूल्य ०-१२-०

वीर सावरकर जयंति निबंध स्पर्धेतील........

# चार यशस्वी निबंध

५९२५९

(१) वीर सावरकरांचें सामाजिक कार्य

ले. कृष्णाजी रघुनाथ काळे, नासिक

(२) रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळेना !

ले. कु. आशा लक्ष्मण दातार

(३) लेखण्या मोडा आणि बंदुका उचला

ले. भालचंद्र केशव आपटे

(४) हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळींतील वीर सावरकरांचें स्थान

...राव रामदास

REFBK-0008525

डाक व्यय ... मूल्य ०-१२-०

मुद्रक :- पंडित बखले, निर्भय मुद्रणालय, रानडे पथ, दादर, मुंबई २८

प्रकाशक :- व्यवस्थापक साप्ताहिक हिंदु, अखंड हिंदुस्थान प्रकाशन (मर्यादित) रानडे पथ, दादर, मुंबई २८

# प्रास्ताविक

आजच्या परिस्थितींत देशहितार्थ अत्यंत आवश्यक असलेलें स्वा. वीर सावरकरांचें तत्वज्ञान वाचण्याची, अभ्यासिण्याची आणि तें सुसंगत मांडण्याची आवड आजच्या तरुण पिढींत जी आहे तीस अुत्तेजन देण्यासाठीं काय करावें असा विचार चालू असतां अेक कल्पना सुचली कीं ह्या तत्वज्ञानाचा विचार ज्यांत आवश्यक ठरेल असे विषय देअून अेक निबंध चढाओढ लावावी.

ही कल्पना पटल्यानें, किंबहुना ज्यांच्या मनांत हीच कल्पना होती असे अेक दानशूर सावरकरभक्त पुढें आले आणि त्यांनीं अेकट्यानीं ह्या चढाओढींतील पारितोषकांसाठीं आवश्यक ती ७५ रुपयांची रक्कम स्वतः देण्याचें मान्य केलें.

त्यांच्याकडून होकार मिळतांच साप्ताहिक 'हिंदु'च्या दि. २।५।१९५५ च्या अंकांत पुढील पत्रक प्रसिद्ध करण्यांत आलें--

## वीर सावरकरांचे वाढदिवसानिमित्त

## निबंध चढाओढ

वीर सावरकरांचे ७३ व्या जयंतिनिमित्त निबंध चढाओढीसाठीं म्हणूनच अेका सद्‌गृहस्थानी ७५ रुपये देण्याचें मान्य केलें असून त्याप्रमाणें आम्ही पुढील चढाओढी प्रकट करीत आहों.

### गट १ पारितोषक रुपये ५०

महाशाळेंत (कॉलेजमध्यें) शिकणाऱ्या कोणाहि विद्यार्थ्याला किंवा विद्यार्थिनीला किंवा १९५२ मध्यें वा त्यानंतर S. S. C. अुत्तीर्ण झालेल्या कोणाहि व्यक्तीला ह्या गटांतील चढाओढीत भाग घेतां येअील. खालीलपैकीं कोणत्याहि अेका विषयावर निदान ५००० शब्दांचा तरी निबंध मराठी भाषेंत

लिहून तो दि. २० मे १९५५ पर्यंत आमचेकडे पाठवावा.

निबंधाचे विषयः– १) लेखण्या मोडा आणि बंदुका घ्या

(२) हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीतील वीर सावरकरांचें स्थान

(३) वीर सावरकरांचें काव्य

(४) आजच्या परिस्थितींत 'बडे' राष्ट्र होण्यास भारतानें काय करावें

## गट २ पारितोषक रुपये २५

ह्या गटांत प्रशाळेंतील (High School मधील) अथवा ह्या वर्षी S. S. C. ला बसलेल्या कोणाहि विद्यार्थ्याला वा विद्यार्थीनीला भाग घेता येईल. खालीलपैकीं कोणत्याहि अेका विषयावर निदान २५०० शब्दांचा तरी निबंध मराठी भाषेंत लिहून तो दि. २० मे १९५५ पर्यंत आमचेकडे पाठवावा.

विषय :– १) रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले

२) वीर सावरकरांचें सामाजिक कार्य

३) हिंदुत्व हेंच राष्ट्रीयत्व आहे.

ह्या चढाओढीचा निर्णय दि. २८ मेच्या बेतास प्रकट करण्यांत येईल. निबंध चढाओढीचा निर्णय हा अंतिम शब्द समजला जाईल. तरी स्पर्धकांनीं ह्या चढाओढीत भाग घेऊन ह्या कार्यीं सहकार्य द्यावें ही विनंती.

हेंच पत्रक किंवा त्याचा सारांश, विविधवृत्त, केसरी, विवेक, भारत, लोकमान्य, गांवकरी आदि अनेक वृत्तपत्रांनीं छापून ह्या चढाओढीस प्रसिद्धी दिली आणि तीं वाचून ३०।३५ निबंध आमच्याकडे आले. ते निबंध लेखक पुढील प्रमाणें :—

महाशाळा (कॉलेज) गट :- ना. भि. दिक्षित, स. श्री. कुळकर्णी, र. वा. रामदास, श्री. गो. जोशी, स. ग. सप्रे, बा. अ. देशपांडे, चं. स. टोणगावकर, भा. के. आपटे, शा. शं. कुळकर्णी,

प्रशाळा (हायस्कूल) गट :- पु. गो. जोशी, प्र. ना. परांजपे, रा. ना. वडार, र. मो. बडवे, रा. कृ. काळे, सु. शि. खोचीकर, र. मु. खांबेकर, बाळ वहुलेकर, कु. आशा ल. दातार, श. वि. शिधये, ग. वा. कुळकर्णी प्र. ज. काळे, र. चिं. देशुरकर, व. ना. भावे, मो. मा. वाळिंबे, अ. अ. लाटकर, म. बा. देशमुख, कृ. र. काळे, वा. ना. आपटे, मा. स. भोसले, प्र. ग. चित्राव, वि. द. परांजपे, गो. अ. जहागिरदार, स. स. घाटगे, ज. का. वैशंपायन, पां. द. देशपांडे.

यापैकीं ज्यांचे निबंध पहिल्या क्रमांकाचे ठरले ते अितरांनाहि वाचावयास मिळावेत आणि त्यांनाहि ह्या विषयाचा विचार करावा असें वाटावें म्हणून हे विद्यार्थी लेखकांचे निबंध पुस्तक रुपानें प्रसिद्ध केले जात आहेत.

ह्या चढाओढींत ज्या अनेक व्यक्तींनीं आम्हांस सहाय्य केलें त्यांचे आभार मानणें हें आमचें कर्तव्यच आहे. पुस्तक प्रकाशनाला विशेष चालना मिळण्याचें श्रेय वैद्य सौ. जानकीबाअी रामकृष्ण पुराणिक संचालक वातविकार चिकित्सा मंदिर, मुंबअी यांसच आहे. चातुर्मासानिमित्त जें दान द्यावयाचें तें त्यांनीं ह्या पुस्तक प्रकाशनाला दिलें असून त्यांच्या दानांतून ह्या पुस्तकाच्या ५०० प्रति वाचनालय आणि अभ्यासू विद्यार्थ्यांना त्यांचेकडून केवळ डाकव्यय घेऊन देण्याचें ठरविलें आहे.

अशाच प्रकारें आणखीहि कार्य आमच्या हातून करून घ्यावें अशी परमेश्वराची प्रार्थना करून हें प्रास्ताविक पुरें करतों.

—प्रकाशक

दा. क्र. 18924
अनु. क्र. 98८९८
विभाग का. ग.
२८/१/५५

# वीर सावरकरांचे सामाजिक कार्य

लेखक:– कृष्णाजी रघुनाथ काळे

वाअीटांतूनहि चांगले निघते म्हणतात ना ? १० वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा म्हणजे जीवनाचा अंतच नव्हे काय? शिक्षा अैकतांच सर्व लोक म्हणू लागले, " संपले ! सारे संपले !! सावरकराच्या कर्तृत्वाला आतां पूर्ण॰ विराम मिळाला ! त्यांच्या आयुष्यांत ते अितकेंच कार्य करू शकले, त्यांच्या नशिबांत, आता कल्लू नी काथ्याकूट ! अंदमानच्या कारागाराच्या भिंतीनीं सावरकरांना त्यांच्या कर्तृत्वासह गिळून टाकलें

पण–त्यांच्या कर्तृत्वाचा नवीन पैलू दृग्गोचर व्हावयाचा होता म्हणूनच ते पकडले गेले कीं काय कुणास ठाअुक!

किती तरी क्रान्तिकारक असे होते कीं, त्यांना राजकारणांतून अुठून जावें लागलें, कीं सामाजिक जीवनातूनहीं अुठून जावें लागे. राजकारण संन्यास म्हणजे जणू त्यांचा कर्तृत्व संन्यास. लोकहि असेंच समजत. त्यांनाहि तसेंच वाटे. म्हणूनच सावरकरांच्या विषयीं पण साऱ्यांची हीच समजूत झाली. त्यांना वाटलें

" संपले ! सारे संपले !! सावरकरांचे कर्तृत्व हरपलें !!! "

पण • • • • राजकारण म्हणजे जीवनाची अितिकर्तव्यता असें ते स्वतः मानींत होते कां ? जीवनाविषयीं कां त्यांची ही दृष्टी होती ? ते तर म्हणतात " राजकारणाव्यतिरिक्त मार्गेहि आम्ही पुष्कळ लोकसेवा आणि साहित्यसेवा करूं शकूं "

"राजकारण करू देत नसाल तर अितर दिशेनें देशाची आणि मानवजातीची सेवा करीन " (माझी जन्मठेप पृ. ४३९)

ते असें म्हणू शकले कारण, राजकारण हें त्यांचें जीवनकार्य नसून समाज

सेवा हे त्यांचे ध्येय होते. राजकारण हें समाजसेवेचें अेक साधन होतें. प्रभावी साधन होतें म्हणाना ! म्हणून त्यांनीं राजकारण हातीं घेतलें, पण राजकारण करावयास मिळण्याची शक्यता नष्ट होतांच, समाजसेवेच्या अितर अंगाकडे त्यांनीं आपली दृष्टि वळविली. अेक हत्यार गेले पण दुसरें तर आहे ना ?

अंदमानांत त्यांनी समाजकार्याला सुरवात केली ती कैद्यांना साक्षर करण्यापासून. ना पुस्तक ना कागद ना पाटी ना पेन्सिल. सर्वांत मुख्य अडचण म्हणजे विद्यार्थीच मुळीं शिकायला तयार नाहीं. प्रत्येक संकटाना यांनी यशस्वी रीत्या तोंड दिलें देशद्रोह्यांना देशभक्त बनविणारे सावरकर, विद्यार्थ्यांच्या नकाराला का घाबरणार होते ? का ते माघार घेणार होते ? कैद्यांनी शिकावे म्हणून सावरकर त्यांना लालूच दाखवित तर कित्येकांना स्वत:च्या अत्यल्प मिळकतीतून शिष्यवृत्तीहि देत. आजच्या शिक्षकांनी त्यांचा आदर्श ठेवला तर · · · · ?

थोड्याच काळांत त्यांच्या कार्याचें यश दिसूं लागलें ८० टक्के कैदी साक्षर झाले. गांधींची अफ्रिका ही जशी प्रयोग भूमि होती त्याप्रमाणें अंदमान म्हणजे जणूं सावरकरांची प्रयोगभूमिच. त्यांनी तेथें समाजकार्याचीं जीं जीं रोपें लावलीं तीं तीं रोपे पुन्हा रत्नागिरींतहि लावलीं. तेथेंच त्यांनीं दुसरी चळवळ सुरू केली ती म्हणजे— **शुद्धिकरण**

शुद्धिकरणाचें कार्य त्यांनीं किती मोठ्या प्रमाणांत केलें याला महत्व नसून हिंदुधर्माला मुकलेल्या लोकांना हिंदुधर्म खुला आहे, अेवढेच नव्हे] तर अहिंदुना देखील हिंदुधर्म खुला आहे. हा मोठा सिद्धान्त त्यांनी मांडला. आपल्या कृतीनें सिद्ध करुन दाखविला, परक्यांना हिंदु होतां येत नाहीं, होता येणार नाही ही जी तत्वप्रणाली रूढ होती त्या तत्वप्रणालीचा जो बुरुज हिंदु-धर्माचें विशालत्व रोखून धरीत होता. त्या बुरूजाला त्यांनी शुद्धिकरणाचा सुरूंग लावला. त्या बुरूजाच्या ठिकर्‍या ठिकर्‍या अुडविल्या. विशाल हिंदु-धर्माला अधिकच विशाल बनविलें.

अडचणी तर खूप होत्या. पण त्यांतूनहि त्यांनी मार्ग काढला. अंदमानांत त्यांनी जेंव्हा पहिल्या माणसाला हिंदु केलें तेंव्हा अितर कैदी त्याला आपल्या पंक्तींत जेवावयास बसूं देअीनात. सावरकरांचा युक्तिवाद अेकूनहि घेअीनात. त्यावेळेस सावरकर त्याना म्हणाले,

" बाबा रे ! हात जोडतो पाया पडतो पण याला विरोध करूं नका. " अखेर सावरकर त्या हिंदुधर्म स्वीकारलेल्या माणसाच्या शेजारी जेवावयास बसल्यावर तें प्रकरण मिटले.

अशा रीतीनें लोकांना हिंदु केल्यानंतर सावरकरांनी त्यांच्या- कडे दुर्लक्ष केलें नाही. नाहींतर अितर नेते कोणताही प्रश्न हाताळतात, अवघड करतात व सोडून देतात, त्यांच्या आदेशाप्रमाणें वागणारे मात्र फशी पडतात. सावरकरांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले असते तर ' अितो भ्रष्टस्ततो भ्रष्टः ' अशीच त्यांची स्थिती झाली असती. पण सावरकरांनीं त्या लोकांना कधीहि हिंदु झाल्याबद्दल खेद होअूं दिला नाहीं. रत्नागिरीत असतांना अशा लोकांचे लग्नसमारंभ देखील त्यांनीच पार पाडले.

रत्नागिरीत स्थानबद्ध असतांना सावरकरांनीं केलेली मोठी गोष्ट म्हणजे

## जातिभेदाचे अुच्चाटन

कोणत्याहि गोष्टीला ते पूर्ण विचारांतीच हात घालीत. ती गोष्ट कशी पायरीपायरीनें केली असता शक्य होअील याचा ते विचार करीत. निश्चित कार्यक्रम आखीत मग धुमधडाक्यानें आपलें कार्य सुरू करीत. त्याच वेळेस त्यांची प्रभावी लेखणी त्यांना जोराची साथ देअी. त्यांचे लेख वाचतांच मन खडबडून जागे होअी. त्याच वेळेस रत्नागिरीत चाललेल्या कार्याची नौबतही त्यांच्या कर्णपथावर येअून आदळे. त्यामुळें सावरकरांचे कार्य अधिकच यशस्वी होअी.

सावरकर नेते होते तसेंच कार्यकर्तेहि होते.ते सर्वांत पुढें जाअून लोकांत

गतीचा मार्ग दाखवित, मागे राहून नव्हे.

जातिभेद हा जन्मजात नसून पोथीजात आहे. सावरकरांनीं जाति-भेदाचीं चार कारणें सांगितलीं. १ व्यवसायबंदी २ स्पर्शबंदी ३ रोटीबंदी ४ बेटीबंदी

जातिबद्ध व्यवसायबंदी तोडल्यानें ब्राह्मण्य, राजन्य, वाणिज्यादी गुणांत, शक्तींत नी व्यवसायांत राष्ट्र अपकर्ष पावत नसून अुलट गुणनिष्ठ व्यवसाय स्वतंत्रतेनेंच तें भरभराटू शकतें हे सिद्धच झालें होतें. कारण व्यवसायबंदी ही भारतांत देखील पूर्वीच नष्ट झालेली आहे.

## स्पर्शबंदी

स्पर्शबंदी नष्ट व्हावी म्हणून सावरकरांनी अेकत्र भजनाचे कार्यक्रम केले. जाहीर व्याख्यानें ठेवलीं. अस्पृश्यांना मंदीरप्रवेश नव्हता म्हणून त्यांनी पतितपावन मंदिर स्थापन केलें. अशा रीतीनें सार्वजनिक ठिकाणीं स्पर्शबंदी नष्ट करण्यासाठीं ज्या ज्या गोष्टी शक्य होत्या त्या त्या गोटी त्यांनी अंमलांत आणल्या.

पण स्पर्शबंदी नष्ट व्हावी म्हणून त्यांनी सर्वांत महत्वाची कोणती गोष्ट केली असेल ती ही कीं, शाळेंमध्यें स्पृश्यास्पृश्यांचीं –

मुलें सरमिसळ बसविणें,

हीच गोष्ट सर्वांत परीणामकारक होती. त्यामुळें मुलांच्या मनांत स्पर्शबंदीची कल्पना देखील शिल्लक राहीली नाही. पुढची पायरी घेतल्यावांचून मागची मागें पडत नाहीं. म्हणून सावरकरांनी लागलीच पुढें पाअूल टाकलें तें –

## रोटीबंदी

नष्ट करण्यासाठीं ! त्यासाठीं त्यांनी अेकच अेक मोठा कार्यक्रम केला तो म्हणजे

सहभोजन ! सहभोजन ! ! सहभोजन ! ! !

सहभोजन सुरूं होतांच स्पर्शबंदी कोठच्या कोठें पळून गली. सह-भोजनाचा धुमधडाका सुरू झाला. रोटीबंदी नष्ट करणें म्हणजे ब्राह्मणानें वा मराठ्यानें अितर जातीबरोबर जेवलेंच पाहिजे सहभोजन केलेंच पाहिजे असें नव्हे तर कोणी ब्राह्मण वा मराठा वा वाणी कोणत्याही अितर जाती बरोबर जेवला, सहभोजनांत भाग घेता झाला, तरी त्यामुळें त्याची जात जाण्याचें कांहीं अेक कारण नाहीं अशी समज रूढावली कीं, रोटीबंदीची बेडी तुटली. या दृष्टीनें पहातां आज रोटीबंदी जवळ जवळ नामशेषच झाली आहे. याला कारण समाजसुधारक सावरकर होत.

वन्हि तो चेतवावा रे ! चेतवीतांचि चेततो !!
केल्यानें होत आहे रे ! आधीं केलेंचि पाहिजे !!

समर्थांच्या या सूक्ताप्रमाणें सावरकरांनी रत्नागिरींत कार्य केलें नि 'केल्यानें होत आहे रे !' हें पटवूनहि दिलें. त्यांनी रत्नागिरींत पेटविलेल्या वन्हीच्या ठिणग्या सार्‍या महाराष्ट्रभर अुडाल्या आणि त्यांतूनच 'झुकाण भाकर सहभोजन संघ' स्थापन झाला. त्यांनी पेटविलेल्या ह्या वन्हीमध्यें रोटीबंदी कोठच्या कोठे जळून खाक झाली. राज्यसत्ता अुलथून पाडण्यासाठीं त्यांनी बाँबगोळ्याचा अुपयोग केला तर रोटीबंदी अुखडून टाकण्यासाठीं त्यांनीं बुंदीच्या लाडूंचा अुपयोग केला.

आतां राहिली ती

## बेटी बंदी

ही गोष्ट मात्र अत्यंत अवघड नि त्रासदायक होती. बेटीबंदी तोडणें याचा अर्थ जो तो आपल्या फायद्याप्रमाणें काढू लागला. महार म्हणू लागले आम्ही अुच्चवर्णीयांच्या पोरी करणार पण स्वतःच्या पोरी भंग्यांना द्यावयाच्या हे कळतांच त्यांचे डोळे पांढरे झाले. खुद्द सुधारक देखील घाबरुन गेले. पण कोणती गोष्टी समाजाच्या पचनी पडेल नि कोणती नाहीं याचे त्यांना पूर्ण

ज्ञान होतें. म्हणून त्यांनी सांगितले "बेटीबंदी तोडणे म्हणजे अमक्या जातीच्या मुली तमक्या जातींत दिल्याच पाहिजेत अशी आज्ञा नसून जर कोणा हिंदुनें प्रेमशील, सुप्रजनक्षम प्रभृति वैवाहिक गुणानुकूल असा अन्य जातीचा हिंदु वधूवर निवडला तर केवळ जात भिन्न अेवढ्यासाठींच तो विवाह निषेधिला जाअू नये वा त्या योगें त्या वधूवरांस पूर्णपणें व्यवहार्य समजण्यांस हरकत असू नये, अशी अेक अनुज्ञा आहे."

या वरून सावरकरांच्या नेतृत्वाची खरी पारख होते, अत्युत्साही लोकांना ते सौम्य करीत नि मंदकार्‍याला जोराची गती देत. त्यांनी जातीभेद नष्ट करण्याचें सतत कार्य केलें. मानीव अुच्चनीचता नि प्रकट गुणावाचून केवळ जन्मामुळेच मिळणारे विशिष्टाधिकार हे काढून घेतल्यानंतरही अुरणारा जो जातिभेद, तो विषारी दांत पाडून टाकलेल्या सापासारखा, आणखी कांहीं काळ जरी वळवळत राहीला तरी फारशी चिन्ता नाहीं ! जातीभेदाच्या अुच्चाटनाचें कार्य करतांना त्यांच्या डोळ्यापुढें अेकच अेक गोष्ट होती ती म्हणजे – 'सामर्थ्य आहे चळवळीचें ! जो जो करील तयाचें ! !'

तुरुंगांत त्यांनी थोड्याशा लोकांना साक्षर केलें असेल ! थोड्याशा भागांत जातीभेद नष्ट करण्याचा प्रयत्न केला असेल !! कांहीं लोकांना परत हिंदुधर्मांत घेअून थोड्याशा बाटलेल्या लोकांचा प्रश्न सोडविला असेल !!! पण माझ्या मतें त्यांचें सर्वांत मोठें सामाजिक कार्य म्हणजे

## रूढीवर प्रहार

रूढीवर प्रहार करून त्यांनी कोटिकोटि लोकांच्या अुद्धाराचा प्रयत्न केला. वरील सर्व गोष्टी करतांना त्यांनी रूढीवर प्रहार केलाच पण प्रत्यक्षतः सर्व लोकांच्या आचरणांत असणार्‍या, त्यांच्या मनांत खटकणार्‍या बुद्धिहीन रूढीवर त्यांनी जबरदस्त आघात केला. हिंदुसमाजाच्या प्रगतींत अडथळा आणणारी 'समुद्र यात्रा स्वीकारः कलौ पंच विवर्जयेत् ।' या सारखीं

जिल्हा वाचनालय
नं.

घचनें त्यांनी हास्यास्पद करून टाकलीं.

खरोखर शेकडो अल्लाअुद्दीन औरंगजेबाच्या तलवारीनें आपल्या हिंदुराष्ट्राची जितकी कत्तल केली नाहीं तितकी आम्हीच आमच्या राष्ट्रीय संतानांची भयंकर कत्तल या धर्मभावनेच्या तलवारीनें केलेली आहे !

त्या वेळेंस समाजांत तीन वर्ग होते.

१) सनातनी

२) रूढींचा फोलपणा पटत असूनहि त्या आचरणारे

३) रूढींना हसणारे परंतु कालांतरानें ज्यांनी त्या रूढी अनुसरल्या असत्या असे

सावरकरांनी जेंव्हा रूढीवर आपलें लेखणीचें प्रभावी हत्यार अुपसलें तेंव्हा ३ र्‍या वर्गाचे लोक त्यांचे अनुयायी झाले. दुसर्‍या वर्गाचे लोक तटस्थ राहिले तर सनातनी त्यांना कसून विरोध करू लागले. सावरकरांच्यामुळें दुसर्‍या नि तिसर्‍या वर्गाचे कोटीकोटी लोक त्या मूर्ख रूढीपासून बचावले हें त्यांचें महान् सामाजिक कार्य नव्हे काय ? " गो हमारी माता है । " मग तिच्या आडून आम्हांवर शस्त्र चालविणार्‍या शत्रूवर आम्ही अुलट शस्त्र कसें अुपसावें ! कारण गोहत्त्या, मातृहत्त्या माथी बसेल ना !

मुसलमानांच्या हातचें पाणी प्याला कीं झाला मुसलमान.

मुसलमानांच्या हातचे फुटाणे खाल्ले कीं झाला मुसलमान या पासून तों

हिंदुचे प्रेत चितेंत जाळले तरच ध्याला मोक्ष मिळेल तेंच ते विद्युत् चितेंत जाळलें तर . . . ? तर ! मेल्यावर देखील त्याचें हिंदुत्व जाअील. "

अशा तर्‍हेच्या अेक का दोन, शेकडो गोष्टी हिंदूंच्या मनांत नि आचारांत घर करून राहिल्या होत्या. या चालीरीतींवर जेंव्हा त्यांनी लेखणी चालवली तेव्हां, शुद्धिकरणानें झाला बसेल ! स्पर्शबंदी मोडल्यानें झाला

नसेल ! ! सहभोजनानें झाला नसेल !!! अितका गोंधळ माजला.

सनातनी म्हणू लागले,

'आमच्या धर्म भावना दुखवूं नका अं ! '

सावरकरांनी त्यांना तडफेनें अुत्तर दिलें,

' ज्याला जें सत्य वाटेल, त्यानें तें प्रकटपणें अुपदेशावें, जो धार्मिक वा सामाजिक आचार लोकहिताला विरुद्ध जातो आहे वा असत्यावर आधारलेला आहे तो तसा असल्याविषयीं युक्तिसंगत चर्चा करण्याचा अधिकार प्रत्येकास असावा. जी खोटी घातक नी अनिष्ट ती ती समजूत, धर्म म्हणून जरी ती आदरली जात असेल तरीहि तिचा अुच्छेद करणें हें प्रत्येक लोकहितैषी पुरुषाचें कर्तव्यच आहे. ती समजूत धार्मिक असली तरी दुर्बुद्धि आहे सुबुद्धि नव्हे!

असें अुत्तर देतांना त्यांनी लोकमताची पर्वा केली नाहीं. त्यांच्या लोकप्रियतेलाहि ओहोटी लागण्याचा संभव होता. कांहीं हितचिंतक सांगू लागले, " अेवढ्या मोठ्या कष्टानें मिळवलेली लोकप्रियता अुगीच कां गमावतां ! जरा लोकांच्या कलानें ध्या " पण त्यांनीं त्याकडे लक्ष दिलें नाहीं. अंदमानांत शिक्षेचा त्रास सहन करतांना त्यांनीं विचार केला, स्वातंत्र्यासाठी कोणीना कोणी असें पिचत राहिलेंच पाहिजे मग आपणच कां राहू नये ? त्याप्रमाणें ह्या वेळेस पण त्यांनी असाच विचार केला असेल कीं लोकांच्या ह्या कोत्या मनोवृत्तीवर कोणीना कोणी प्रहार केलाच पाहिजे मग तो आपणच कां करू नये. कारण ?

'वरं जनहितं ध्येयं केवला न जनस्तुस्तिः ।

' केवळ कालच्या पोथीच्या शब्दानें 'आज' बांधलेला नसावा आणि 'अुद्या' तर नसावाच नसावा. ' असें त्यांचें ठाम मत होतें. त्या मताचा त्यांनीं सतत जोरदार पुरस्कार केला. केवळ त्यांचे लेख वाचल्याबरोबर सर्व लेख वाचल्याबरोबर सर्व लोकांनीं रूढी पार धुडकावून लावल्या असेंच कांहीं

नव्हे. जुनाट रोग हळूहळूच जाणार पण त्यासाठीं जी सतत औषध योजना करावी लागते ती करण्याचें काम सावरकरांनींच केलें. हेंच त्यांचें सर्वांत मोठें कार्य होय.

' ही प्राचीन श्रुतिस्मृतिपुराणादि शास्त्र अैतिहासिक ग्रंथ म्हणून संग्रहालयांत ससन्मान ठेवून आतां विज्ञानयुगाचें पान अुलटलें पाहिजे ' असें ते म्हणत कारण आज विज्ञान हेंच प्रगतीचें साधन आहे किंबहुना तो प्रगतीचा अेकमेव मार्ग आहे हें त्यांनीं जाणलें होतें. म्हणूनच त्यांनीं विज्ञानाचा पुरस्कार केला.

पुरुषानां अुपदेश करतांना त्यांनीं स्त्रीयांकडे दुर्लक्ष केलें नाहीं. स्त्रीयांचें कर्तृत्व व्रतांतच खर्च होत होतें. त्या व्रताचें अिहलोकीं कोणतेंही फळ दृष्टीस पडत नव्हतें. परलोकीं त्याचें फळ मिळतें कीं नाहीं, हें त्या भगवानालाच माहिती लक्ष वाती जाळीत बसणाऱ्या, वडाऱ्या झाडाला फेऱ्या घालणाऱ्या स्त्रीयांना त्यांनी सांगीतलें तुम्हाला सुख हवे ना ? वैभव हवें ना ? मिळेल पण———

व्रतानें नव्हे तर विज्ञानानें. निर्जीव वृक्षाला फेऱ्या घालून का सुख मिळणार आहे. कष्ट करा पण ते योग्य जागीं. व्रतेंच करावयाचीं ना ? मग अशीं करा —

लाख वाती अैवजी मी माझ्या अंगणांत शक्य तितक्या भाज्या लावीन. अनाथ विद्यार्थी गृहासारख्या संस्थेला त्या फुकट पुरवीन. होअू देत या व्रतानें लाख मुलें संतुष्ट.

अशा प्रत्येक व्रतास जी कसोटी लावावयाची ती ही कीं, ह्या व्रतानें ह्या लोकीं स्वतःचा स्वतःच्या, राष्ट्राचा वा अेकंदर मनुष्य जातीचा कांहींतरी प्रत्यक्ष लाभ होतो आहे ना ?

कोणतीहि गोष्ट आचरावयास सांगतांना सावरकरांची दृष्टि

सतत राष्ट्राकडे लागलेली होती. कोणत्याहि गोष्टीचा ते राष्ट्राच्या फायद्याशीं समन्वय लावीत जणूं राष्ट्रोन्नति हा त्यांचा ध्येयबिंदू असून त्याजवरील त्यांची दृष्टि कधीच विचलीत झाली नाही. त्यांनी सांगितलेली प्रत्येक गोष्ट याच्याशी ताडून पहा कीं, 'ह्या दानानें वा कर्मानें माझ्या राष्ट्राची कांहीं तरी प्रत्यक्षसेवा घडत आहे ना ?

कोणतीही गोष्ट मुलखा वेगळी करावयाची सारासार कोणत्याच गोष्टीचा विचार करावयाचा नाहीं असें त्यांचें मुळीच म्हणणें नव्हतें. ते फक्त असें म्हणत कीं,

" कालपर्यंतच्या सर्व ज्ञानाची कसोटी घेऊन आणि उद्याच्याही क्षितिजाचें दिसूं शकेल तितकें रूपरंग पाहून मग जें आज राष्ट्रहितास उपयुक्त ठरेल तें, त्यास त्या जुन्या पोथ्यांचा शास्त्रार्थ सांपडत नसला तरी बेधडक आचारलें पाहिजे "

वर सांगितलेल्या सर्व गोष्टी म्हणजे वीर सावरकरांचें सामाजिक कार्य होय. तें करतांना त्यांनी कधीं युक्तिवाद केला कधी तत्वसंगत चर्चा केली. कित्येक वेळां त्यांनी कार्य केलें व आपलें यशच लोकांच्या नजरे समोर ठेवलें. त्यांनी लोकमत अजमाविलें पण लोकमताची त्यांनी कधीच पर्वा केली नाहीं. लेखलिहून त्यांनी आपल्या मताचा प्रसार केला. त्यांच्या लेखांनी केवळ महाराष्ट्रच गाजविला असे नसून त्यांच्या घोषणांचे पडसाद पंजाबपर्यंत जाऊन पोहचले. सर्व समाजाच्या मनामध्यें त्यांनीं अपूर्व क्रान्ति केली. आपल्या विचारांनी त्यांनी सर्व समाज हेलावून सोडला.

त्यांच्या कार्याचें मोजमाप करतां येणें कधीच शक्य नाहीं. त्यांची मतें लोकांना पटलीं पण त्यांपैकी कितीजणांनी किती आचरणांत आणलीं असतील हें सांगणें मुष्कील आहे.

ही गोष्ट कितीहि सत्य असली तरीहि जेव्हां कोणती ना कोणती पिढी

त्यांच्या म्हणण्या प्रमाणें आचरण करू लागेल तेव्हां तिच्या प्रगतीचें मूळ शोधता शोधता ती जरूर सावरकरांच्या 'दोन शब्दांत दोन संस्कृति' व 'आज पेशवाअी असती तर' ह्या दोन लेखांपर्यंत थडकेल. समाजकार्य करणाऱ्या तरुणाना त्यांनी दिलेला संदेश हा आज अमर झाला आहे.

ते म्हणतात—

'सोडून दे त्या स्पर्शबंदीच्या पोथीजात जातपातीच्या ५००० वर्षा-पूर्वीच्या भाकड भावना! तोडून टाक त्या तुझ्या कर्तव्याच्या पायांत पडलेल्या ह्या शद्बनिष्ठ श्रृतिस्मृतिपुराणोक्त प्रवृतींच्या बेडया! आणि जें जें हत्यार तुझ्यावर चढून आलेल्या आजच्या आपत्तिच्या अुच्छेदास आज समर्थ होअील, अुपस तें हत्यार! मग तें तुझ्या पुरातनाच्या शस्त्रागरांत सापडो वा ह्या नवीनच्या शस्त्रागारांतून छिनता येवो."

अुपसूं या आपण तें हत्यार. करु या त्यांचे मनोरथपूर्ण. त्यांनी केलेल्या समाजकार्याचें फळ त्यांना अिहलोकींच मिळूं द्या, त्यासाठींच त्यांनी अुच्चारलेला! त्यांनी अुच्चारलेला!! त्यांनी शिकविलेला मन्त्र आपण लक्षांत ठेवू या.

केल्यानें होत आहे रे! आधीं केलेंचि पाहिजे!!

—★—

अनुक्रम ९५८८
विभाग ८.५.
२००४
क्र. २८८५५

# रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें ?

## लेखिका :—कु. आशा लक्ष्मण दातार

स्वातंत्र्य ही अेक महान् सिद्धि आहे. आणि ती मिळविण्यासाठीं कष्टहि तसेच पडतात. ती सिद्धि मिळवायला करावी लागणारी तपश्चऱ्या तर अुग्र आहेच. पण तिच्या पूजेचें सामानहि तसेंच आहे. तिच्या पूजेला देशभक्तांचीं प्राणपुष्पें लागतात. स्वातंत्र्याची जी देवी तिची ही पूजा करायची. तिच्या पूजेला गंध रक्ताचें लागतें. परकीय सरकारच्या त्रासामुळें हीनदीन झालेल्या प्रजेचे अश्रू हे तिचे अर्घ्य. तिला बळी परकीय सरकारचा. तिच्या निरांजनांतील ज्योत परकीय सरकारची प्राणज्योत. आणि तिचें साध्य स्वातंत्र्य. पूजेची सामुग्री जमवून तिच्यापुढें ठेवली कीं ती निरांजनांतील ज्योत विझते. आणि प्रसन्न होअून तिच्याकडून भक्त ज्याची अपेक्षा करतो तें या पूजेचें साध्य, स्वातंत्र्य, ती त्या भक्ताला देते. स्वातंत्र्य ही अेक महान् शक्ति आहे. स्वातंत्र्य हा राष्ट्राचा मानबिंदू आहे. आणि म्हणूनच तो परकयांकडून हिरावला जातो.

स्वातंत्र्य ह्या तीन अक्षरी शब्दांत काय जादु भरली आहे कीं स्वातंत्र्या-करितां देशभक्त घर आणि दार यांचा त्याग करतात आणि स्वतःचा देह मायभूवरून ओवाळून टाकतात आणि मृत्यूशीं झुंज खेळायला तयार होतात. हें स्वातंत्र्य म्हणजे आहे तरी काय ? अेखाद्या राष्ट्राचें दुसऱ्या राष्ट्रावर वर्चस्व असतें ह्याचा तरी काय अर्थ ? ज्या राष्ट्राचें दुसऱ्या राष्ट्रावर वर्चस्व आहे असें म्हटलें जातें, त्या राष्ट्रांतील अधिकारी ज्या राष्ट्रावर त्यांचें वर्चस्व असतें त्या राष्ट्रांतील राज्यकारभार चालवितात. तेथील लोकांना हवी तशी वागणूक देतात. आणि त्यांचें हित अनहित तेच ठरवितात आणि याच्याविरुद्ध तेथें रहाणाऱ्या लोकांच्या मनांत, हे कोण आमचा राज्यकारभार चालवणार ?

यांचा धुन्मटपणा आम्हीं कां सहन करावा ? आमचें हित अनहित ते कोण ठरवणार ? तें कांहीं नाहीं. आमचा राज्यकारभार आम्हींच चालवूं. यांचा अुन्मटपणा आम्हीं सहन करणार नाहीं. आमचें हित अनहित आम्हींच ठरवूं आणि आमचा देश भरभराटीला आणूं. अशी जी भावना ब्युत्पन्न होते तिचें नांव स्वातंत्र्यलालसा ! आणि परकीयांच्या हातून स्वतःचा राज्यकारभार स्वतः करण्याचा जो अधिकार आपल्या हातांत घेतात त्याचें नांव स्वातंत्र्य !! स्वातंत्र्य ही गुलामगिरींत पडलेल्या राष्ट्राची संजिवनी आहे. आणि म्हणूनच संजीवनी जितकी दुर्लभ तितकेंच स्वातंत्र्य मिळणें दुर्लभ आहे. त्याकरितां भगीरथ प्रयत्न हवेत अेरवीं तें अशक्य आहे, हें अुघड आहे.

कारण त्या देशांवर ज्यांचें वर्चस्व आहे ते लोक अितक्या सुलभपणें राज्यकारभार तेथें राहणाऱ्या लोकांच्या हातीं देतील ? छट नांव कशाला ? क्रूर पशू कधीं सामोपचारानें वठणीवर येतील कां ? राज्यतृष्णेची मदिरा प्यालेले सत्तेच्या मदानें धुंद झालेले ते सत्ताधारी विनवण्या केल्या तरी स्वातंत्र्य देतील काय ? गाढवापुढें गीता वाचली म्हणून कांहीं तें लाथा मारायचें सोडील थोडेंच ? तें गप्प बसावें अशी जर तुमची अिच्छा असेल तर तुम्हांला त्याला काठी घेअूनच बडवायला हवें. स्वातंत्र्य कधी साम नि दाम या अुपायांनीं मिळत नाहीं. त्याला दंड हाच अेकमेव खात्रीचा अुपाय आहे. गोव्याचेंच अुदाहरण पहा कीं. फार मागें नको जायला. गोमांतकीय जनतेचा निःशस्त्र लढा, भारतीय सत्याग्रही ह्यांचीं निःशस्त्र पथकें. आणि भारतीय सरकारनें अजून ह्या बाबतींत कडक अुपाययोजना केलेली नाहीं. पोर्तुगीज सरकारचा छळ आणि आरेरावी वाढतच आहे. पोर्तुगीज लोकांना जास्तच चेव चढला आहे. हत्तीच्या अंगावर मुंगी चढली तर हत्तीनें दुर्लक्ष करावें हें ठीक आहे. परंतु ती मुंगी जर कानांत शिरूं लागली तर ती क्षुद्र आहे म्हणून दुर्लक्ष करून नाहीं चालणार. कारण प्राणावरच बेतेल. त्यावेळीं

तिचा बंदोबस्त केलाच पाहिजे.

कोणत्याहि राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरितां निःशस्त्र चळवळ हा कांहीं मार्ग नव्हे. बैलाचा हृदयपालट व्हावा म्हणून कोणी अुपोषण केलें तर कांहीं अुपयोग आहे त्याचा ? किंवा हृदयच नाहीं तेथें हृदयपालट कोठून ? बरेच दिवस सत्याग्रहाचें सत्र चालू राहिलें तर सरकार जनलज्जेस्तव नाअिलाज म्हणून वाटाघाटी सुरूं करील हें खरें आणि त्यावेळेला तें सरकार आपल्याजवळ पिंजऱ्यांत असलेल्या पक्षाला, तो पारतंत्र्यात आहे म्हणून त्याला वाअीट वाटत असेल म्हणून आकाशांत विहार करायला सोडून देणाऱ्या अुदारधी महात्म्यानें त्या पक्ष्याचे पंख आधीच कापलेले असतील. त्यामुळें तें पुनः त्याच्याकडे येअीलच अशी त्याची खात्री असेल. त्यामुळें पाखराला सोडल्याचा मोठेपणा पदरांत घेअून शिवाय पांखरूहि गमावलें नाहींच शिवाय तो पक्षीच अुडत नाहीं. मी तरी काय करूं ? असें म्हणायला आहेच तयारी. तसेंच त्या सरकारनें नाअिलाजानें वाटाघाटी केल्या तरी तें राष्ट्र पुन्हां आपल्या आश्रयाला येअीलच असें करून ठेवील. म्हणजे स्वतंत्र होअूनहि पुन्हां तें राष्ट्र त्याच्या वर्चस्वाखालीं राहीलच. बरें त्या पुढाऱ्यांनीं ती ग्यानबाची मेख ओळखून तो तहाचा मसुदा अमान्य केला तरी पुन्हां नाहीं देत स्वातंत्र्य गुलाम राष्ट्रावर अुपकार ना करतात ते स्वातंत्र्य देतात म्हणजे ! आणि पुन्हां जगभर डंका पिटायला मोकळेच, कीं तें राष्ट्र तहाच्या अटीच कबूल करीत नाहीं. आम्हीं तरी काय करावें ? म्हणजे करून सवरून शिरजोर. विसाव्या शतकांत भारतानें सत्याग्रहाच्या मार्गानें स्वातंत्र्य मिळवलें असें म्हणतात तें क्षणभर खरें धरलें तरी स्वातंत्र्य मिळालें पण कसें ? अखंड भारताचे दोन तुकडे झाले. पुन्हां ब्रिटिशांनीं सर्व संस्थानें स्वतंत्र केलीं. त्यांचें विलीनीकरण होअीपर्यंत किती त्रास पडला. काश्मिरचें घोंगडे भिजत पडलेंच आहे.

ज्या दोन राष्ट्रांत वाटाघाटी व्हायच्या तीं जर समान पातळीवर नस-

तील तर त्या वाटाघाटींना काय अर्थ अुरला ? जें राष्ट्र बलिष्ठ आहे ते गरजू राष्ट्राकडून आपल्याला हव्या त्या अटी कबूल करून घेणार हें अुघड आहे. कारण जो तो आपल्या पोळीवर तूप ओढत असतो. मग गुलाम राष्ट्राला आमचें सैन्य तुमच्या रक्षणाकरतां ठेवतों कारण अजून तुम्हांला संरक्षणाची गरज आहे. आम्हांला तुमच्या देशांत अेका सैनिकी तळाला जागा द्या· तुम्हीं सक्तीनें तटस्थ राहिलें पाहिजे अशा अटी घालण्यात येतात. परवां रशियानें ऑस्ट्रियाला स्वातंत्र्य दिलें म्हणें. पण तटस्थ राहिलें पाहिजेच अशी अट घातली. तें राष्ट्र स्वच्छेनें तटस्थ राहात असेल तर राहू द्या पण जबरदस्ती कां ? जर त्यानें तटस्थ रहायचें कीं नाहीं हें सुद्धां तुम्हीच ठरवतां मग त्याला स्वातंत्र्य दिलें तरी कसलें ? याला काय स्वातंत्र्य म्हणतात ? हें कसलें स्वातंत्र्य ? हें बेगडी स्वातंत्र्य. ही स्वातंत्र्याची थट्टाच नव्हें तर काय ? असें स्वातंत्र्य निःशस्त्र लढा आपल्याला मिळवून देतो पण त्याचा अुपयोग काय ? कांहींच नाहीं.

आणि म्हणूनच खरें स्वातंत्र्य मिळविण्याचा आणि परकयांच्या मगरमिठींतून सुटण्याचा अेकच अेक मार्ग म्हणजे लढाअी. अर्थात हा मार्ग वाटतो तेवढा सोपा खासच नाहीं. नव्हे कठीणच आहे, खास. पण देश स्वतंत्र करण्याचें सतींचे वाण ज्यांनी घेतलें आहे, ज्यांना देशाकरता कांहींतरी करून मरण्याची अिच्छा आहे मायभू-विषयींचें पवित्र कर्तव्य पार पाडायला जे आतुर झाले आहेत त्यांना हा पर्याय रुचेल, पटेल आणि हे लोक ज्यावेळेला नेमबाजी शिकतील अुठाव अेकमुखी करतील त्या वेळेला त्यांना मिळालेलें यश भरघोस असेल, जर त्या देशांत फितुरच असतील तर तें स्वातंत्र्य अिच्छिणारें राष्ट्रच नव्हे, असें म्हणावें लागेल. ब्रिटिशांच्या मगरमिठीतून सुटण्यासाठीं अुत्कृष्ट लढा दिला आयर्लंडनें.

या बाबतींत दुसरे अुत्कृष्ट अुदाहरण अमेरिकेचें, संयूक्त संस्थानाचें.

अमेरिका आज जागतिक कीर्तीचा अत्यंत संपन्न नि पुढारलेला देश आहे. पण त्यावरहि ब्रिटिशांची सत्ता होती. स्वातंत्र्य मिळावें म्हणून त्यानीं चळवळी केल्या पण ब्रिटिशांनीं दडपशाहीं करून त्या चळवळी बंद केल्या. ब्रिटिश सरकारनें चळवळींना दाद दिली नाहीं. अखेर जॉन्ज वॉशिग्टनच्या नेतृत्वाखालीं त्यांनीं युद्ध पुकारलें आणि ब्रिटिश सेनापती लॉर्ड कॉर्नवॉलिस याला दे माय धरणी ठाय करुन सोडले ! तेव्हां तो शरण आला आणि अमेरिकेला स्वातंत्र्य मिळालें.

दुसरा जगांतील अग्रगण्य देश रशिया, रशियांतील झारच्या जूलमाला तेथील कामगार कंटाळले होते. छळ त्यांना सहन होअीनासा झाला होता. पण झारला पदच्युत करताना किती दिवस त्यांनीं तयारी केली होती. त्यांच्या हातांतले नांगर जाअून बंदुका आल्या तेव्हांच ते झारला पदत्यूत करूं शकले. अिथें काय सत्याग्रानें भागलें असतें ? आणि प्रतिस्पर्धी समान असल्याशिवाय लढाअी तरी कशी करायची ? ते सशस्त्र आणि आपण निःशस्त्र ! मग काय लांडग्यांनी कोकरांच्या कळपावर हल्ला करावा तशी आपली स्थिती होअील ना. प्रतिकार करतानाहि विचार करून केला पाहिजे. अेरव्हीं नाहक जीव जायचा. देशाला अुपयोग कांहीं नाहीं. असें करून काय अुपयोग ?

हैद्राबादमध्यें रझाकारानी किती धुमाकूळ माजवला होता. पण भारतीय सैन्यानें हैद्राबादला वेढा घातला मात्र आणि नाक दाबताच तोंड अुघडून अपोआप हवे ते अुद्‌गार बाहेर पडावे तसें हैद्राबाद सरकार शरण आलें.

व्हीअॅटनाममध्ये व्हीअेटनाम लोकांनीं अितकी बंडाळी माजवली कीं फ्रेंच सरकारला अतःपर तेथें राहणें अशक्य झालें. तेव्हां फ्रेंच सरकाराचे डोळे अुघडले आणि व्हिअेटनामला स्वातंत्र्य मिळालें.

भारतीय स्वातंत्र्याकरतां तर दीडशे वर्षें प्रयत्न चालू होते. १८५७

चें स्वातंत्र्यसमर ही त्या प्रयत्नांची नांदी. नंतर वासुदेव बळवंतांनीं केलेली अुठावणी. कट वगैरेहि भरपूर झाले. पण रक्ताचा थेंबहि न सांडता भारताला स्वातंत्र्य मिळालें असें जें म्हटलें जातें तें मात्र मला पटत नाहीं. कारण दुसऱ्या महायुद्धांत हिटलरची सरशी होअु लागली तेव्हां मनुष्यबळ आणि साधनसामुग्री हिंदुस्थाननें पुरवली. पुढाऱ्यांच्या आदेशावरून हजारो हिंदी सैनिक लढाअीवर गेले. हजारो धारातीर्थीं पडले. नेताजींनीं आझाद हिंद सेना अुभारून यशस्वी कूच केलें. हिंदुस्थानच्या दारावर धडका बसत होत्या. हिंदुस्थान आपल्याला गमावायची पाळी येअील असें ब्रिटिश सरकारला वाटत होतें. चले जावची चळवळ सुरू झाली होती. निरनिराळे कट होअून जुलमी अधिकारी मारले गेले होते. दुसरें महायुद्ध संपल्यामुळें रिकामे असलेले सैनिक पुन्हा अुठावणी करायला कबूल झाले असते. या सर्व गोष्टींचा विचार करून ब्रिटिश सरकारनें स्वातंत्र्य दिलें. तो कांहीं केवळ सत्याहाग्राचा विजय नव्हे.

अवघ्या २७ व्या वर्षीं फ्रान्सचा मुक्तिदाता म्हणून जगानें ज्याची पाठ थोपटली तो नेपोलीयन. फ्रान्सच्या मुक्ततेकरतां जमवलेल्या सैन्याचा अुपयोग मागून अितर देश जिंकण्याकरतां त्यानें केला असेल. पण प्रथम फ्रान्सची मुक्तता त्यानें केली. सैन्य हातांत असून सुद्धां त्याचा अुपयोग तुम्हीं दुसऱ्यांचें स्वातंत्र्य हिरावून घ्यायला नका करूं फार तर. कबुल. तुमच्या देशाच्या स्वातंत्र्यरक्षणासाठीं तुम्हांला सैन्य हवेंच. पहिल्या महायुद्धांत नामशेष झालेला जर्मनी, त्याला घातलेल्या अपमानकारक अटी धुडकावून देअून जर्मनीला स्वतंत्र करण्यासाठीं हिटलरला रणशिंग फुंकावें लागलें. जर्मनी नुसता स्वतंत्रच झाला नाहीं, राखेवर संजीवन शिंपडून महाबलाढ्य राक्षस निर्माण व्हावा तद्वतच जर्मनी बलिष्ठ नव्हे सहासात कोटींचा चिमुकला जर्मनी जगाला भारी झाला. दुर्दैवानें त्याचा पराभव झाला पण सैन्यबळ काय करू शकतें याचें अुत्कृष्ट अुदाहरणच त्यानें जगाला दिलें.

मराठ्यांचें गेलेलें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं मावळ्यांची संघटना

करून, विजापूर व मोंगल यांच्याशीं शिवाजीला झुंज द्यावी लागली. सैन्यबळ अुत्कृष्ट ठेवावे लागलें. तेव्हांच तो स्वातंत्र्य मिळवू शकला.

तत्व आणि व्यवहार यांची सांगड घालूनच शहाणा माणूस जगांत वावरत असतो. माणसानें कोणतींहि तत्वें संपूर्णपणें व्यवहारांत अुतरवणें योग्य नाहीं. तसें करण्याचा परिणाम काय होअील, याचा विचार केला पाहिजे. व्यवहारांत कांहीं वेळेला तत्वें बाजूला ठेवून वागावें लागतें. प्रत्येक गोष्ट तत्वाप्रमाणें करण्याचा आग्रह धरून जगांत सुखानें वागता येणार नाहीं अुदाहरणार्थ अहिंसा हें अेक सुंदर तत्व आहे. मुक्या प्राण्यांचे बळी घेअू नयेत. मांसाहार करूं नये अीथपर्यंत हें ठीक आहे. पण तत्व किती प्रमाणांत व्यवहारांत अुतरावें याला कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं ? याच्या पुढची पायरी म्हणजे सैन्य ठेवू नका. अहिंसा तत्वानें देशाचे रक्षण कोण करणार आणि कसें करणार ? मग हें तत्व संपूर्णपणें व्यवहारांत अुतरवणें कसें शक्य आहे ? आणि अुतरवले तर दुसरें तिसरें कांहीं नाहीं पण देशहित तर आपण साधणार नाहींच पण देशाचे अकल्याण मात्र करू. स्वातंत्र्य मिळवणें तर कठीण आहेच. पण त्यापेक्षांहि तें टिकवणें जास्त कठीण आहे. आणि देशाच्या संरक्षणासाठीं सैन्य आवश्यक आहेच. आणि नवोदित राष्ट्राच्या स्वातंत्र्य रक्षणासाठीं प्रत्येक तरुणानें सैनकी शिक्षण घेणें आवश्यक आहे. मॉस्कोतील तरुणांनीं शस्त्रास्त्रांनीं रशियाचें दुसऱ्या हायुद्धांत रक्षण केलें.

या वरून लक्षांत आलेंच कीं स्वातंत्र्य ही कांहीं सहज मिळणारी वस्तु नाहीं. आणि दिखाअू स्वातंत्र्य झालें तरी सहज मिळूं नयेच. कारण सहज मिळणाऱ्या वस्तुंची कोणाला किंमत नसते तिचा वाटेल तसा वापरहि केला जातो. संस्कृत मध्यें अेक असें वचन आहे, अतिपरीचयादवज्ञा संततगमनादनादरो भवति। मलये भिल्लपुरन्ध्री चन्दनतरुकाष्ठमिन्धनं कुरुते ।।

जिल्हा वाचनालय

रशियांत जायची कुणाला सहसा परवानगी मिळत नाहीं. त्यामुळें अेखाद्याला विचारलें कीं तूं अमिरेकेला जातोस का रशियाला? तर तो साहाजीकच अुत्तर देअील, रशियाला. कारण अमेरिका काय केव्हांहि पाहतां येअील. पण रशिया कोण दाखवणार? तेव्हां पाहयाला मिळतय तर पाहून घ्या स्वातंत्र्य हाल आपेष्टा सोसून मिळालें असलें म्हणजे आपल्याला अशी जाणीव असते कीं स्वातंत्र्याकरता आपण अितक्या हालअपेष्टा सोसल्या आहेत. तें आतां आपणाला टिकवलें पाहिजे. लढाअी करुन स्वातंत्र्य मिळालेलें असलें कीं तें सैन्य राष्ट्राच्या रक्षणाला रहातें. सत्याग्रहांनीं वगैरे स्वातंत्र्य मिळाले असलें कीं राष्ट्राच्या पुनर्रचनेला सुरवात होते. सर्व महत्वाच्या जागावरले तज्ञ, अधिकारी परकीय निघून गेलेले असतात. त्यामुळें त्या सैन्याचा अुपयोग राष्ट्राच्या रक्षणास होत नाहीं. मग राष्ट्र बलिष्ठ होअी-पर्यंत अीतरांशीं किती पडते घ्यावें लागते. आपल्यावर स्वारी होअू नये. म्हणून किती जपावें लागतें. देश स्वतंत्र झाल्यावर अुद्योगधंद्याची वाढ करणें पिकें वाढवणें अशीं किती कामें आपल्याला करायाचीं असतात. पण हें करायची म्हणजे शांतता हवी, म्हणजे सैन्य हवेंच. देशाच्या हद्दीवर कुणी आक्रमण केल्यास लढाअीविना गत्यंतर नाहीं.

आपण ज्या तत्वांना मान देतों तीं जर तशींच्यातशींच आपण व्यवहारांत अुतरवलीं तर जग अेक साधुपुरुष म्हणून आपणाला वंदन करील. बोले तैसा चाले म्हणून लोक आपल्याकडे आदरानें बघतील. पण देशहित तुम्ही साधू शकत नाहीं. कीर्ति खूप मिळवाल. सत्य नि अहिंसा हीं तत्वें जगाला सांगून आणि स्वतः जन्मभर त्याचप्रमाणें वागून गौतम बुद्धानें चिरंतन कीर्ति मिळ-वली. तो अमर झाला. पण कौटिलीय अर्थशास्त्र लिहिणाऱ्या आर्य चाणक्यानें हिंसेचा असत्याचा आश्रय केला. परंतु त्यानेंच भारताला सबंध भारताला अेकछत्री राज्य करणारा भारताचा पहिला अैतिहासिक राजा सम्राट् चंद्रगुप्त मौर्य मिळवून दिला. आर्य चाणक्याची वैयक्तिक कीर्ति झाली नाहीं पण

देशहिताचें केवढें महान कान्य त्यानें साधलें होतें. वैयक्तिक यशापयश हें नशिबावर अवलंबून आहे. पण राष्ट्रांतील प्रत्येक नागकरिकचें ध्येय देशहिताचें पाहिजे. देशहिताकरतां कांहींहि करावें लागलें तरी चालेल. कारण देशहित हे केव्हांहि जास्त महत्वाचें आहे. म्हणूनच देशहितासाठीं जर लढाओी ही अत्याव- श्यक गोष्ट आहे तर जोपऱ्यंत आपला देश पारतंत्र्यात आहे तोपऱ्यंत अहिंसा तत्वाची मनांत भुरळ पडून चालणार नाहीं. स्वातंत्र्य मिळेपऱ्यंत मी करतो हें योग्य कीं अयोग्य हा विचारहि मनांत येअून चालणार नाहीं. फक्त अेवढेंच लक्षांत ठेवायचें कीं मला माझ्या देशाला स्वातंत्र्य मिळवून द्यायचें आहें आणि त्याकरतां काय वाटेल तें मला केंलें पाहिजे. मग हे अधऱ्मयुद्ध आहे, मी शत्रूला फसवूं कसा ? हे विचार राष्ट्रघातकी आहेत. अेकदां तुमच्या राष्ट्राला स्वातंत्र्य मिळालें तुमच्या राष्ट्रांत स्थिरस्थावर झालें कीं बाळगा तुमची तत्वें अुराशीं. तुमच्या राष्ट्रावर स्वारी झाली तरी तुमचीं तत्वें गुंडाळून ठेवून लढणें प्राप्त आहे. अेरवी तुम्हीं वागा हवें तसें पण लढाअीच्या वेळेला तुम्हीं तीं तत्वें गुंडाळून ठेवली पाहिजेत. नाहींतर समजा, शत्रूचें मऱ्म तुम्हांला कळूनहि तुम्हीं त्यावर हल्ला केला नाहींत तर तुमच्या राष्ट्राचा नाश हा ठरलेलाच.

तुमच्याकडे सैन्यातल्या बड्या अधिकाऱ्याची जागा असली आणि अेन लढाअीच्यावेळीं हिंसा कशी करावी असें तुम्हांला वाटूं लागले तर तुम्हीं सैनि- कांना लढण्याचा हुकूम देणार नाहीं आणि मग मात्र पराजय अटळ ! त्याच्या पाठोपाठ पारतंत्र्य हें आलेंच. तत्वाला चिकटून बसलात तर सऱ्वस्व गमावाल ना ह्या वेळीं. पुन्हां देश पारतंत्र्यात पाडल्याबद्दल जनता तुमच्या नांवानें बोटें मोडीलच. तुम्हीं दुसऱ्यांचें स्वातंत्र्य नका हिरावून घेअूं. म्हणून कोणी दुसरा तुमचें स्वातंत्र्य हिरावून घेअूं लागला तर गप्प बसायचें कीं काय ? छे ! त्यानें अेक मारली तर आपणहि मारायची. आपण दुसऱ्याची कुरापत कधीं काढूं नये पण दुसऱ्यानें आपली कुरापत काढली तर नाहीं स्वस्थ बसायचें. ज्या वेळेला आपला देश वैभवाच्या शिखरावर असेल परचक्र येण्याची यत्किंचितहि

दा. क. ८९२५

भीति नाहीं अितका तो बलिष्ठ असेल त्यावेळेला तीं तत्वें अुराशी बाळग- णारांचा कवींचा लेखकांचा, गौरव होअील. पण वाटेल ते डावपेच खेळून ज्यांनीं स्वातंत्र्य मिळवलें जे वीर मातृभूकरतां धारातीर्थी पडले ज्यांनीं आपलें सुखाचें जीवन सोडून कष्टमय जीवन सोसले त्यांचें काय ? अितक्यांचा वैयक्तिक सत्कार झाला नाहीं. त्या देशानें त्या रोमहर्षक लढाअीचे पोवाडे गायले असतील. पण तीं जर त्यांनीं तत्वें अुराशीं बाळगली असतीं, देशभक्तीपेक्षां वैयक्तिक कीर्ति जास्त महत्वाची मानली असती तर हे सुखाचे दिवस देशाला दिसले असते का ? त्यांच्यापैकी प्रत्येक तरुणाच्या मनांत वैयक्तिक किर्ती मिळवण्याची महत्वाकांक्षा असेल पण देशहिताकरतां झालेल्या स्वातंत्र्ययज्ञांत त्या महत्वाकांक्षेचीच काय पण स्वत:चीहि आहुती त्यांनीं दिली मग खरे थोर कोण ? खरी देशसेवा कुणी केली ? त्यांना कुणी अशीं आश्वासनें दिली नव्हती. कीं तुमच्या मागें तुमच्या मुलाबाळांची काळजी घेतली जाअील, त्यांना निवृत्तिवेतन नव्हतें. त्यांना फक्त अेवढेंच समाधान होतें की आपल्या मरणानें देशाला स्वातंत्र्य मिळणार आहे.

नि:शस्त्र राजकारण हें अेक मृगजळ आहे. मृगजळाच्या पाण्यानें तहान भागत नाहीं त्याचप्रमाणें नि:शस्त्र राजकारणानें खऱ्या स्वातंत्र्याची तहान भागत नाही. पारतंत्र्याचा हिंवताप घालवायचा असेल तर लढाअीचें क्रांतीचें कोयनेल घ्यायला हवें. तेंच सत्वर गुणकारी ठरतें ! पारतंत्र्याचा हिंवतापावर स्वातंत्र्य मिळवायचं म्हणजे वीरमाता आणि वीरपत्नी देशांत निर्माण व्हाव्या लागतात.

स्वातंत्र्याकरतां केलेली जी लढाअी तिचें नांव क्रांति. क्रान्ति याचा अर्थच मुळीं अेका स्थितीतून दुसऱ्या स्थितींत जाणें. स्वातंत्र्य आपणाला याचकरतां हवें असते. अेक राजवट सुरु होणार असते. पारतंत्र्याची रात्र संपून स्वातंत्र्याची प्रभा आपणाला दिसते. या दृष्टीनें क्रांती हें किती समर्पक

नांव आहे ! क्रांतीत मिळमिळीतपणा नाहीं भीरुता नाहीं, क्रान्तीत सर्वत्र जळजळीतपणा आहे. परकीय सरकारला जाळणारा अग्नि आहे. अन्धसत्य असत्य ही गोष्टच नाहीं ! फक्त सत्य. क्रान्ती ही गोष्ट खडतर तपश्चर्येशिवाय होत नाहीं क्रांतीचा मार्ग हा दगडधोंड्यांनी भरलेला आहे. त्या मार्गानें चालण्यास सुरुवात केली कीं मागें फिरतां येत नाहीं किंवा मधें विश्रांति घेतां येत नाहीं. मार्ग चालताना वाटेंत काटे टोचतात. दगड बोचतात काळोखाच्या किर्र सावल्या भेवडावतात जीव नकोसा वाटतो. पळून जावेंसें वाटतें पण जो धैर्यानें सारे सोसतो, मार्ग शेवटपर्यंत आक्रमतो त्याच्या स्वाग ताला स्वातंत्र्याची दिव्य प्रभा असते. ती दिसतांच त्याचें मन प्रसन्न होतें. सारे श्रम हरतात.

स्वातंत्र्यकमल अुगवायला देशभक्तांच्या रक्ताचाच चिखल लागतो जसजसें देशभक्तांचें बलिदान होतें तसतशी स्वातंत्र्यमंदिरातील अेकेक वीट रचली जाते. क्रान्तीच्या वाटचालीबरोबरच स्वातंत्र्यकमलाची अेकेक पाकळी अुमलते, क्रान्तीसूर्य अुगवूं लागतांच स्वातंत्र्यकमल विकसतें. क्रांतीचा सूर्य पारतंत्र्यरुपी अंधार नष्ट करतो.

आज जगांत अनेक राष्ट्रें आहेत. कांहीं स्वातंत्र्य मिळवण्याकरता धडपडत आहेत. पण राखण्याकरतां संस्कृतिहि भिन्न आहेत. पण अितिहासावरु नहि असे दिसतें कीं अनादि काळापासून जगातील राष्ट्रांनीं आपलें अेक ब्रीदवाक्य कायम ठेवले आहे. कालमानाप्रमाणें राजकारणपद्धती बदलत गेली. पण तें ब्रीदवाक्य मात्र बदललें नाहीं. तें ब्रीदवाक्य म्हणजे 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें'.

# " लेखण्या मोडा आणि बंदुका घ्या "

ले. भालचंद्र केशव आपटे

अेका महान् गृहस्थानें पूर्वी असें म्हटलें आहे कीं 'Pen is mighter than sword.' नेहमीच्या पद्धतीप्रमाणें या नवीन सिद्धांताबद्दल कांहींनीं अनुकूल अुद्गार काढले असतील, कांहींनीं विरोध केला असेल तर कांहींनीं तिरस्कारही केला असेल. परंतु आज तरी हें वाक्य केव्हांही प्रतिपक्षाला चीत करण्याचें प्रभावी शस्त्र म्हणन वापरलें जातें.

१९३८ सालीं मुंबअीस भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष-पदावरून स्वा. सावरकर यांनीं 'लेखण्या मोडा व बंदुका घ्या' या महावाक्याची संथा तेथें जमलेल्या साहित्यिकांनां दिली. पूर्वीच्या सिद्धांताप्रमाणेंच याही सिद्धांताविषयीं अनुकूल प्रतिकूल टीका झाली. कांहीं साहित्यिकांच्या लेखण्या या महामंत्राचे समर्थन करूं लागल्या तर कांहीं लेखण्या या विरुद्धही लिहूं लागल्या. स्वा. सावरकरांनां कांहीं लेखक आपल्या खाजगी संभाषणांत 'हिटलर' 'राक्षस' आदि विशेषणें अर्पण करूं लागले तर कांहींनीं अेक 'मोठा' मनुष्य वायां चालल्याबद्दल खेद प्रदर्शित केला. अेकंदर परस्पर विरोधी अशा दोनही सिद्धांतांनां सारखीच वागणुक मिळाली. स्वा. सावरकरांची तर्कशुद्ध विचारसरणीबद्दल ख्याती आहे. तर मग सावरकरांनीं मांडलेला हा सिद्धान्त तर्कशुद्ध होता काय ? या मागील त्यांची वैचारिक भूमिका काय आहे ? याला अितिहासाचा आधार काय ? या सिद्धांतामागील परंपरा काय ? या सिद्धांताच अुपयोग काय ?.... आदि प्रश्न मनांत गर्दी करतात.

' बळी तो कान पिळी ' हा निसर्गाचा नियम आहे असें शास्त्रज्ञ आप-

णांस सांगतात! आपले अहिंसक (नव्हें अहिंसावादीच) राज्यकर्ते याला जंगलचा कायदा (Law of jungle) असें म्हणतील परंतु कसेही असलें तरी त्याचें सत्व व्यापित्व दिसून येतें. लहान मासा मोठ्या माशाचें भक्ष होय. अशक्त सशक्ताकडून जिंकला जाणारच. बलशाली राष्ट्र बलहीन राष्ट्राला गिळंकृत करणारच. कारण ' जीवो जीवस्य जीवनम् '। तेव्हां या निसर्ग-नियमांच्या अस्तित्वांत जीवंत रहावयाचे असल्यास सामर्थसंपन्न होणेंच अिष्ट अन्यथा नाशच. कांहीं ' विद्वान ' म्हणतात कीं खरें सामर्थ्य शस्त्रांत नाहीं कारण जगण्यासाठीं सामर्थ्याचा अुपयोग करणें व हिंसा म्हणजे सर्वस्वीं त्याज्य. अेवढेंच नव्हें तर हिंसेनें मिळालेलें जीवन मृत्युसमान होय. यास अुत्तर अेकच कीं जगावयाचें आहे तर शत्रूची हिंसा केलीच पाहिजे नाहीं तर आपलीच हिंसा ठरलेली आहे. व आमच्या दृष्टीनें जगण्यासाठीं वाटेल तो अुपाय योजणें आवश्यकच आहे, मग तो कसाही असो हिंसक वा अहिंसक. राष्ट्राचें लष्करी सामर्थ्य वाढविणें म्हणजेच राष्ट्र बलवान् करणे होय. अुत्कृष्ट शील्पकला निर्माण होणें, अुत्कृष्ट चित्रें निर्माण होणे, महान् कवी व लेखक निर्माण होणे ही कांहीं राष्ट्र बलवान असण्याची लक्षणें नव्हेत रोम व प्राचीन आर्य रानटी लोकांकडून धुळीस मिळाले नसते, नुसतीच अधीक शस्त्रे असणें हें सामर्थ्याचें लक्षण नव्हे तर आपल्या शत्रू पेक्षां अधीक प्रभावी शस्त्रें असणें याचेच नांव सामर्थ्य. आज जगतामध्यें वडें कोणास म्हणतात? अमेरिका अिंग्लंड रशिया यांना! कारण, त्यांच्याजवळ अितर सर्वांपेक्षां प्रभावी शस्त्रास्त्रें, विनाशिका, पाण-बुड्या, लढाअु विमानें, अणुध्वम् यांचा भरपूर साठा व त्यांचा अुपयोग करू शकणारे कुशल सैनिक भरपूर आहेत. वरील सर्व सिद्धांतांना अितिहासाचें पाठबळ आहे. अितर सर्व कारणांपेक्षां लष्करी सामर्थ्य अप्रभ ठरल्यानें राष्ट्रें च्या राष्ट्रें त्यांचे शत्रूराष्ट्रांकडून धुळीस मिळालीं आहेत. चीन—जपानच्या लढाअींत चीनचा पराभव झाला. त्या युद्धांत जपानचें म्हणणें सयुक्तिक नव्हतें. नैतिकदृष्ट्या जपानचीच चूक होती. तरीसुद्धां जपानचा विजय झाला याचे

कारण त्याचें वरचढ लष्करी सामर्थ्य. मुसलोनीने अॅबिसिनीया गिळला तो कशाचा जोरावर? केवळ लष्करी सामर्थ्यावरच. भारत परतंत्र झाला त्याचे ही मुख्य कारण हेंच. रशियानें आपल्या वरचढ प्रतीच्या रणगाड्यांचे जोरावरच जर्मन साम्राज्याला रेटत रेटत बर्लीनपर्यंत पूर्व युरोप काबीज केलेला फोर्मोसावरही चीनचा हक्क न्याय्यच आहे. तरीसुद्धां राष्ट्रवादी चीनला अणुध्वम्-संपन्न अमेरिकेचा पाठिंबा व मदत असल्यानें तो लाल चीनला मिळू शकत नाहीं. गोमांतक भारताचें अविभाज्य अंग आहे तरीसुद्धां भारताला त्यास जवळ करतां येत नाहीं कारण पोर्तुगाल अमेरिकेच्या सहाय्यानेंच आपल्या समोर अुभें आहे, व त्या अमेरिकेला विरोध करणें हें भारताच्या सैनिकी क्षमतेला न पेलणारें असे आहे. ट्रिअेस्टच्या प्रश्नांत युगोस्लाव्हियावर अन्याय झाला असतां त्यांनी न्याय कसा मिळविला तर ट्रिअेस्टच्या सरहद्दीवर आपलें सैन्य आणून ठेविलें. भारताला सतत ९०० वर्षेपर्यंत मुसलमानांपुढें मान तुकवावी लागली त्याला कारण मुसलमानांचें प्रभावी खड्ग. मुसलमानांच्या या अरेरावीला सवाल तेव्हांच विचारला गेला कीं जेव्हां शिवाजी महाराजांची भवानी त्यांचे विरुद्ध विकोष झाली. याचप्रमाणें पारशी व ज्यू लोकांविषयीं म्हणता येअील. ज्यू लोकांनीं जेव्हां अरब राष्ट्राविरुद्ध आधुनिक शस्त्रांसहीत दंड थोपटले तेव्हांच आज २००० वर्षांनंतर ज्यू पुनश्च आपल्या मातृभूमीवर अुभे राहीले. हेंच पारशांविषयीं पहातां अुलट दिसतें. ते जेथे राहीले त्याच भूमिला त्यांनीं आपली मातृभूमि मानली म्हणून ते आज भारतांत पाहुण्यासारखे रहात आहेत. या घटनांवरून अेकच निष्कर्ष निघतो तो म्हणजे डॉ. मुंजे यांचे शद्बांत 'जिसकी फोज अुसका राज'– लष्करी दृष्ट्या बलवान असलेले राष्ट्रच 'राष्ट्र' म्हणून जगू शकते अन्यथा नाहीं. म्हणून तसें मानानें जगावयाचें असल्यास सैनिकी सामर्थ्य वाढविलेंच पाहिजे. अेरवी राष्ट्र गुलाम बनतें अेवढेंच नव्हें तर तें निःशेष होअून जातें. हें लक्षांत असल्यामुळेंच सुभाषचंद्र बोसानीं आपल्या आझाद हिंद सेनेल

'चलो दिल्ली' ची घोषणा दिली. व म्हटलें "तुम मुझे खून दो मैं तुमको आझादी दूंगा"— 'लढण्यास सिद्ध व्हा तरच स्वातंत्र्य मिळण्याची शक्यता.'

वरील सत्त्व विवेचनानें आपण निसर्ग नियमाचें आवलोकन केलें. आतां आपण अधिक पुढें जाऊं.

शस्त्राचें महत्व काय आहे हें पाहिल्यानंतर कोणी असें म्हणेल कीं शस्त्रेंच केवळ महत्वपूर्ण नाहींत तर त्यांच्या मागें लेखणी ही लागतेच. होय परंतु मुख्य प्रश्न असा आहे कीं शस्त्रामुळें लेखणी कीं लेखणीमुळें शस्त्र? याविषयीं विचार करीत आसतानां "लेखणीमुळेंच शस्त्राचें महत्व आहे." या सिद्धांताला अनुकूल असे पुष्कळ विचार आपल्या मनांत येतील ते असे—

चंद्रगुप्ताचें कृपाण केवळ कौटिल्याच्या लेखणीवरच अुदयाला आलें व विजयी झालें. छत्रपतींची तलवार समर्थांच्या वांचून भवानी ठरली नव्हती. व्हॉल्टेअर व रुसो यांच्या लेखण्यांशिवाय फ्रेंचराज्यक्रान्ति अशक्य होती. चंद्रभाटाशिवाय पृथ्वीराज ताऱ्यासारखा चमकून निखळला नसता. राणाप्रतापला लेखणीनें अुत्साह दिला नसता तर तो अकबराचा पादसंवाहक होतानां वचला नसता. अितकेंच नव्हें तर कोणतीही क्रान्ति होण्यापूर्वी लेखणीच्या सहाय्यानेंच होणारी वैचारिक क्रांन्ति अत्यन्त आवश्यक असते आणि त्यांत जर कोठें चूक झाली तर ती हजारोंच्या तरवारी कोषांतच ठेवते, निरुपयोगी करते अथवा स्वकीयांवरच अुलटविते. असें जर आहे तर सावरकरांनीं तरवारींना पाजळणारी लेखणी मोडून टाकून तरवारी घेण्यास सांगणें म्हणजे डायनामाअीट योग्य जागीं ठेवण्यापूर्वीच अुडविण्याअितकें घातुक आहे.

आतां मला वाटतें, आपणापैकीं प्रत्येकजण म्हणेल कीं खरोखरीच बंदुकीपेक्षां लेखणीच अधिक महत्त्वाची आहे. परंतु आणखीन् अेक बाजू दाखविली तर आपले विचार आमूलाग्र बदलतील यांत संशय नाहीं. ती बाजू अशी कीं त्या लेखण्या काय लिहीत होत्या याचे मनन करणें. भराभर लिहून

त्या वाङमय प्रसवीत होत्या कां ठिणग्या पाडून चैतन्य नि आग निर्माण करीत होत्या कीं ज्या आगींत शत्रू भस्मसात होत होते नि तरवारबहाद्दरांचीं अंतःकरणें पेट घेत होती नि या बहाद्दरांच्या तरवारींनींच राष्ट्रकार्‍यासाठीं म्यान्यांतून बाहेर पडून स्वकीय-परकीय राष्ट्रशत्रूंचा समूळ नाश केला. आर्य चाणक्यानें आपल्या लेखणींतून अुतरलेल्या अर्थशास्त्रांत असेंच लिहीले आहे कीं — " धर्मस्य मूलं अर्थः अर्थस्य मूलं राज्यम् राज्यस्य मूलं बलम् " — आणि चाणक्यानें आपल्या लेखणीने तेंच बल निर्माण केलें कीं ज्यामुळें असें राज्य निर्माण झालें की ज्यानें धर्मरक्षण केलें. महाराणा प्रतापसिंह दिल्लीपतीला शरण जाण्याच्या गोष्टी बोलत असतां — तुला दिल्लीपतीनें टाकलेल्या तुकड्यावर जगत असणार्‍या मानसिंहापुढें मान तुकवून त्याचा मान राखावा लागेल — या वाक्यानें त्याला कर्तव्य सन्मुख केलें. समर्थांनींसुद्धा आपल्या लेखणीद्वारा 'शक्तीनें मिळती राज्यें' हेंच सांगितलें. आतां आपणास दिसून येअील कीं तरवारींच्या आधीं नि तरवारीच्या साह्याला लेखणी लागत असली तरीसुद्धां तरवारींच्या साठींच लेखणी झटली तरच ती यशस्वी होते.

आतां प्रश्न असा येतो कीं सावरकरांनीं लेखण्या मोडा बंदुका घ्या हें महावाक्य अुच्चारलें तेव्हां त्यांनीं ' लेखणी ' या शब्दांत कसला कसला निर्देश केला ? राजकारणी पुरूषांचा, साहित्यिकांचा कां कारकुनांचा ? त्यावेळीं त्यांचेपुढें केवळ साहित्यिकच असले पाहिजेत कारण त्यांनीं असें म्हटले आहे कीं ' राष्टीय जीवनाचें संरक्षण हीच आमच्या साहित्याची आद्य चिंता. अगदि कलेसाठींच कलेचा जो अुपासक कलावंत वा साहित्यासाठींच साहित्याचा भक्त आहे त्याविषयीं आदर असावा. पण जर नाटचगृहास आग लागली तर कलेसाठींच कलेला झिडकारून ते तत्क्षणीं त्या आगींतून जीव बचावण्याच्या मार्गास लागतील कीं संगीतांत गुंतून रहातील ? मग राष्ट्रावर बेतली असतां केवळ साहित्याची कथा काय ? आपल्या राष्ट्राची आजची मृत्युंजय मात्रा म्हणजे त्याचे शस्त्रबल-साहित्यबल नव्हे. आपलें हें विस्तीर्ण

भारतीय राष्ट्र आज जगतांत निर्माल्यवत् होअून पडलें आहे तें आपलें साहित्य अुणें म्हणून नव्हे, तर शस्त्रबल अुणें म्हणून. राष्ट्रास आज साहित्यिक नकोत, सैनिक हवेत. लेखणी टाकून भवानी अुचलली म्हणून तर महाराष्ट्र सारस्वत जिवंत आहे - - - तुमच्या डोळ्यांसमोर तुमच्या विद्यापीठांतून श्रीची व सरस्वतीची विटंबना कां ? विद्यापीठाच्या दाराशीं अष्टायुधधारिणी दुर्गा पहारा देत नव्हती म्हणून. मी सांगतों कीं लेखणी मोडून टाकावी व बंदूक अुचलावी. " या 'लेखणी' शब्दांतून आणखी अेक अर्थ निघू शकतो आणि तो म्हणजे कारकूनी ती सोडा व सैनिक व्हा. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या सावरकरांच्या भाषणांत त्यांनीं हेंच सांगितलें आहे. राजकारणी पुरुषांविषयीचा निर्देष या लेखणींतून होत नाहीं. अुदा.- कौटिल्य, रामदास व स्वत: सावरकर यांसारखे राजकारणी साहित्यिक आपणाला हवेच आहेत. थोडक्यांत म्हणजे 'लेखणी मोडा' या शब्दांमधून कारकूनी सोडा, ललित वाङमय लेखक होअू नका असा अर्थच ध्वनित होतो.

— आणि "बंदुका घ्या" या वाक्यभागांतून वरचढ शस्त्रांनीं सुसज्ज व्हा असा संदेश सावरकरांनीं दिला आहे. ठकास महाठक या न्यायानें पाश्चात्य पिस्तुलांनां आपण बंदुकीनें नि बंदुकीला तोफेनें अुत्तर दिलें पाहिजे. अितिहास पहातां हेंच करणें योग्य ठरतें. अग्निपूजक आर्यानीं अंधारांतील अनार्यानां जिंकलें. दारू अुडविणाऱ्या अलेक्झांडरनें धनुष्यबाणवाल्या पोरसला, तोफा डागणाऱ्या मुसलमानांनीं तरवारवाल्या युरोपला, नि नवींनवीं शस्त्रें निर्माण करून गेल्या महायुद्धांत (सुरवातीला) जर्मनीनें जगाला त्राहि भगवान् केलें परंतु जेव्हां युरोपियन लोकांचा तोफखाना मुसलमानांपेक्षां सरस झाला तेव्हां त्यांनां मुसलमानांनां सतत शंभर वर्षें लढून हांकून लाविलें. जेव्हां रशियन (टँक्स) रणगाडे जर्मन रणगाड्यांपेक्षां सरस झालें तेव्हां त्यांनीं जर्मनीच्या राजधानीस सुद्धां धडक दिली.

जिल्हा वाचनालय

म्हणून 'आम्हांला जुनीं शस्त्रें टाकून अद्ययावत् व अधिक चांगली शस्त्रें घेतलीं पाहिजेत' असा 'बंदूका घ्या' याचा अर्थ आणि म्हणूनच स्वा. सावरकरांनीं 'लेखण्या मोडा व तरवार घ्या' असें न सांगतां 'लेखण्या मोडा व बंदूका घ्या' असें सांगितलें व आतां तेंही बदलून आपल्याला या अणुयुगांत हैड्रोजन बाँबपेक्षां जास्त प्रभावी असें अेखादें ब्रह्मास्त्र शोधलें पाहिजे. आतां यापुढें आपल्याला सावरकरांच्या घोषणांचा दूरगामी परिणाम नि त्या परिणामांवरून त्यांच्या विचारसरणीचें अनुमान नि तिची लोकमान्यांच्या, शिवाजीच्या नि कौटिल्याच्या विचारसरणीशीं तुलना करावयाची आहे.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेमध्यें पूर्वी ब्रिटिश सेनेंत चाकरी करीत असलेली बरींच मंडळी होती. त्यापैकीं कांहीं लोक जपानने सिंगापूरला वेढा घालून जिंकलें त्यावेळीं दाखल झाले होते. ही मंडळी त्यावेळीं जपानी सेनेंत दाखल होण्यास तयार नव्हती परंतु हिंदुस्थान स्वतंत्र करण्यासाठीं जर कांहीं कार्यवाही रचणांत आली तर ते त्यांत सामील होण्यास तयार होते. दि. २८ ते ३० मार्च १९४२ ला झालेल्या Tokyo conference of Indians in Japan, China, Malaya & Thialand मध्यें श्री. रासबिहारी बोस यांनीं आझाद हिंद सेना स्थापन केली नि त्या कार्यवाहींत ही सर्व मंडळी सामील झाली. ही गोष्ट १९४२ मार्चची आहे. स्वातंत्र्यवीरांनीं हिंदुयुवकांस १९३८ सालींच 'लेखण्या मोडा नि बंदुका घ्या' हा संदेश देअून हजारोंच्या संख्येने सैन्यांत प्रवेशविलें होतें. ही मंडळी ब्रिटिशांच्या देखरेखीखालीं नव्या युद्धतंत्रांत तयार झाली होती. या मंडळींना सैन्यांत शिरा असा आदेश देण्याचा हेतू अेक असावा तो असा कीं आपली मंडळी आपल्या शत्रूच्या हातूनच त्याचे विरुद्ध तयार व्हावी नि आतापि वातापि राक्षसांच्या गोष्टीप्रमाणें आपण हांक देतांच आपल्या आज्ञेंत हजर व्हावींत. ती गोष्ट अशी आहे कीं आतापि राक्षस अन्नाचे रूपानें वाटसरूंचे पोटांत शिरत असे नि भोजनानंतर वातापीनें त्यास हांक मारल्याबरोबर त्या वाटसरूचें

पोट फाडून बाहेर येत असे नि नंतर दोघे मिळून त्या वाटसरूला गट्ट करीत असत. याचा अनुभव जपानी सेनेचे जनरल फुजिवारा यांनीं आपल्या कैदेंतील ब्रिटिश हिंदी सैनिकांनां रासबिहारींच्या आझाद हिंदसेनेंत सामील करून घेतलें तेव्हां आला.

आतां आपण याची लोकमान्यांच्या विचारांशीं तुलना करूं. लोकमान्य नेहमी म्हणत असत जें मिळेल तें घ्या नि जास्तीसाठीं सतत प्रयत्न करा. अिंग्रज सरकार गेल्यावर राज्यशकट चालविण्यासाठीं सुयोग्य माणसें तयार व्हायला हवींत म्हणून त्यांनीं आपलीं माणसें स्थानिक स्वराज्य संघांत, कौन्सि-लांत, सरकारी अधिकारांच्या जागांवर पेरून ठेविलीं. सामाजिक चळवळी चालवून लोकांनां जागृति दिली अशा तऱ्हेनें आपली माणसें सरकारांत व लोकांत दोघांतही असल्यावर आपल्या अिच्छेप्रमाणें आपण चळवळहि करूं शकतो. व आपल्याला मिळालेल्या सवलतीचा पुरेपूर अुपयोगही करूं शकतों हें त्यांनीं दाखविलें. अर्थात् लोकमान्यांचा मार्ग वैधानिक असल्यानें त्यांनां सशस्त्रक्रान्तिनें जे फायदे मिळाले असते त्यापेक्षां फार थोडें मिळाले. परंतु वैधानिक मार्गानीं जास्तींत जास्त कार्य त्यांनींच केलें. कारण सशस्त्र क्रान्ति करून अिंग्रजांनां घालविणें त्यांनां केवळ अशक्यच वाटत होतें कारण भारतीय सेनेंत त्यावेळीं राष्ट्रीय भारतियांची म्हणजे हिंदूंची संख्या फक्त २० टक्के होती. तरीसुद्धां टिळकांनीं आपलीं माणसें सैन्यांत शिरविण्याचा प्रयत्न केला हें विश्रुतच आहे, पहिल्या महायुद्धांत ब्रिटीशांनां मदत करण्याच्या मिषानें आपल्या माणसांनां सैन्यांत शिरविण्याचा पहिला प्रयत्न- महाराष्ट्रांतून ५००० सैनिक रिक्रूट करण्याची खात्री म्हणून त्यांनीं सरकारला ५०,००० रुपये दिले होते. श्री. मो. क. गांधींसारख्यांनींसुद्धां त्यावेळीं "There can be no friendship between the brave and the effiminate. If we want to become from the reproach we should learn the use of arms. If we want to learn the use

of arms with greatest possible dispatch it is our duty to enlist ourselves in the army. The easiest and the straightway, therefore, to win Swaraj is to participate in the defence of empire." असें म्हटलें. अन्यात लोकमान्य व गांधीं यामध्यें तात्त्विक मतभेद होताच हें वेगळें.

शिवाजीमहाराजांची भेदनीति सन्वश्रुतच आहे. किल्ल्यांमध्यें आपलीं माणसें गुप्तरीतिनें घुसवून किंवा आंतील माणसें फोडून मग आंतून व बाहेरून दोहोबाजूंनीं हल्ला झाल्यास शत्रूची कशी हबेलहंडी अुडते हें आपण जाणतो. चाणक्यानें या नीतीचाच अुपयोग नंदाचें अुन्मूलन करण्यांत कसा केला होता हें आपण जाणतोंच.

आतां आपण या वाक्यामागील भूमिका पाहूं. १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धानंतर ब्रिटिशानीं धक्का घेतला आणि अितिहासाची पुनरावृत्ति होअूं नये म्हणून शस्त्रबंदीचा निन्बंध केला, नि भारताचें राजकारण आणि सैन्यकारण दोन्ही गोष्टी अेकमेकांपासून अलग केल्या. कारण अेकच कीं ज्या सैन्यावर साम्राज्य अवलंबून रहावयाचें त्या सैन्यांत राजकारण आलें कीं साम्राज्य खाक झालेंच हें त्यांच्या लक्षांत आलें होतें. आतां यानंतर स्वातंत्र्यासाठीं वैधानिक (Constitutional) आणि क्रांतिच्या (Revolutionary) दोन्हीं मार्गांनीं प्रयत्न चालूं झाले.

अमेरिकेंतील गदर पक्षानें सुद्धां बंडाची तयारी केली होती व तेथून सुमारें ८००० शीख आले. बंडाचे प्रयत्न, सैन्य फितूर करण्याचे प्रयत्न, गोळ्या झाडून ब्रिटीश अधिकारी मारण्याचे प्रयत्न झाले व त्यांच्यावर खटले होअून शेकडों क्रांतिकारक भारताच्या स्वातंत्र्याचा जयजयकार करीत फांसावर गेले. या व अितर अनेक चळवळीं मिळून हिंदुस्थानच्या पदरांत कांहीं सुधारणा पडल्या. दुधाची तहान ताकावर भागवावी लागली. सशस्त्र व निःशस्त्र

क्रांतीचे प्रयत्न फोल गेले. हळु हळु पुढारीवर्ग स्वातंत्र्याबद्दल साशंक होऊं लागला आणि कांहींतरी नवीन मार्ग शोधण्याची आवश्यकता भासूं लागली कारण १९३२ सालचें पहिलें असहकारिता आंदोलन असफल झालें अशा वेळीं स्वा. सावरकरांनीं भारतीयानां लेखण्या मोडून बंदुका हातांत घ्यावयास सांगितलें. आणि अेक नवी दिशा दाखविली. यांत त्यांचा द्रष्टेपण दिसून येतो तो कसा हें पूर्वीच्या विवेचनावरून दिसून येतें. त्यांना द्रष्टे म्हणण्याचे कारण हेंच कीं 'वाचमर्थोनुधावति' प्रमाणें ते बोलले आणि त्या घटना घडल्या. सावरकरांना हें वाक्य अुच्चारतेवेळीं भविष्यांत होणाऱ्या दुसऱ्या महायुद्धाच्या नौबती अैकूं आल्या असतील नि ब्रिटिशांना हांकून देण्याची वेळ जवळ आल्याचा त्यांना भास झाला असेल, ब्रिटिश सैन्यांतले भारतीय सैनिक सावधान म्हणताक्षणींच अुलट फिरून अिंग्रजांनांच आपल्या बायोनेटचे आपल्या बंदूकांतील गोळ्यांचे लक्ष्य बनवीत असतानां दिसले असतील. आणि पाठोपाठ स्वतंत्र भारताच्या क्षितीजावर सूर्य अुगवलेला त्यांनां दिसला असेल. आणि म्हणूनच त्यांच्या पंचप्राणांतून आणि पंचेंद्रियांतून ही घोषणा निघाली असेल कीं सैन्यांत शिरा आणि सावरकरांनीं १९४० सालीं नेताजींना आपली कोकीळ पक्षासारखी युक्ति सांगितली. कोकीळ पक्षाच्या अंड्यांप्रमाणें आपले सैनिक भराभर ब्रिटिश कावळ्यांच्या घरट्यांमध्यें शिरवून नेताजी सुभाषचंद्रानीं 'चलो दिल्ली' ही घोषणा केल्याबरोबर, कोकीळ पक्षी वसंत ऋतूंत आपलें खरें स्वरूप जसें प्रकट करतो तसें ब्रिटिशांच्याच छातीवर बसावेत हीच ती अजब युक्ति. स्वा सावरकरांच्या या योजनेमध्यें आणखी अेक अत्यंत महत्त्वाची गोष्ट झाली. ती म्हणजे भारतीय सैन्यामध्ये भारतीय हिंदु नि मुसलमान यांचें प्रमाण पूर्वीच्या अगदीं अुलट झालें म्हणजे आतां सैन्यांत ८० टक्के हिंदू नि २० टक्के परके सैनिक झाले आणि त्यामुळेच १९४७ सालीं भारताचें अस्तीत्व राहीलें नाहीं तर भारताचें नांव अितिहासजमा झालें असतें नि सर्वच्या सर्व भरतखंड पापस्तान झालें असतें. अशा तऱ्हेनें अेका दगडानें दोन पक्षी मारले गेले. व भारताचें सैनिकीकरण नि सैन्याचें हिंदूकरण झालें आणि

अनुक्रम ... ग्रं.मि. ३००७ २८।८।५४

म्हणून साहित्यनिर्मितीपेक्षां सैन्यनिर्मिति सावरकरांनीं श्रेष्ठ ठरविली. कारण स्वातंत्र्यावांचून राष्ट्र म्हणजे प्राणांवाचूनचे शरीर. स्वातंत्र्यासाठीं सैन्याची आवश्यकता असताना साहित्यनिर्मिति करणें म्हणजे मढ्यावर आभूषणें चढविण्यासारखें आहे याला सावरकरांच्या या प्रचाराला वंदन करतांना २५ जून १९४४ च्या सिंगापूर नभोवाणीवरील आपल्या भाषणांत सुभाषचंद्र बोस म्हणतात, "When due to misguided political whimes and lack of vision almost all the political leaders of Congress party are decrying all the soldiers in the Indian army as mercenaries, It is heartening to know that Veer Savarkar is fearlessly exhorting the youths of India to enlist in the armed forces. These enlisted youths themselves provide us with trained men from which we draw the soldiers of our Indian National Army."

नुकतेंच अेका जपानी लेखकानें **Two Great Indians in Japan** य पुस्तकांत लिहीले आहे कीं "The chief of I. N. A. (Subhash Bose) proceeded alone to the front line and talked to the Indian officers in the British Army not to be false for their love of India and the independence of India, in strong and heart stirring words. Miracle accomplished !!

The shooting (On the side of British India forces) stopped Savarkar's militarisation policy in world war II began to take shape"

भारताला स्वातंत्र्य देण्याच्या बिलाचे वेळीं पार्लमेंटमध्यें चर्चिलनें मुख्यप्रधान अॅटली यांस विचारलेल्या प्रश्नांस अुत्तर देतानां ते म्हणतात,

"Britain is transfering power due to the fact that The Indian mercennary army is no longer loyal to Britain and Britain can't afford to have a large British army to hold down India". यावरून असेंच दिसून येते कीं सावरकरांचे योजनेप्रमाणें पडलेला

फटकाच ब्रिटीशांना भारी पडला आणि भारताला स्वातंत्र्य मिळाले.

एकंदरीत 'लेखण्या मोडा व बंदुका घ्या' या सूत्राचा अवलंब केल्यानें आम्ही स्वतंत्र होऊं शकलो. भावीकाळ कठीणच आहे ही गोष्ट सामान्य माणसालाही कळूं शकेल आणि म्हणून भारताला आपलें स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं याच सूत्राचा अवलंब करणें भाग आहे.

–जय हिंदुराष्ट्र–

# हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळींतील वीर सावरकरांचें स्थान

ले. रवींद्रनाथ वामनराव रामदास

केवळ राजकीय क्रांतिकारी आणि नेते वीर सावरकर असते तरीहि त्यांचें नांव भारतांचें अस्तित्व असेपर्यंत स्मरणीय झालें असतेंच. पण त्यांचें मूलभूत व्यक्तित्व त्या अेका क्रांतिकाऱ्यापेक्षांहि मोठें अुदात्त आणि समावेशक आहे. ते विहंगमाप्रमाणें प्रतिभेच्या झेंपा घेणारे कवि आहेत. बुद्धिवादाच्या निकषावर सामाजिक रुढि घासून घेणारे सुधारणा प्रेरक आहेत. अनेक विषयांत आपली बुद्धि चालवून सामान्य लोकांना दिसतें त्यापलिकडचें पहाणारे द्रष्टे आहेत. त्यांचें वक्तृत्व श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारें आहे, सर्व जग अुलटें चाललें असलें तरी आपल्याला पटलेला विचार आचार व अुच्चार चालू ठेवणाऱ्यांमध्यें ते निश्चयाचे मेरु आहेत.

ज्याक्षणीं भारत परतंत्र झाला त्या क्षणापासूनच आपल्या स्वातंत्र्य लढयाला प्रारंभ झाला. आपल्या स्वातंत्र्य लढयांत विविधप्रकारच्या साधनांचा अुपयोग करण्यांत आला. अैतिहासिक कालक्रमानुसार सशस्त्र क्रांती, घटनात्मक व शांतता मार्गांनीं राज्यसुधारणा घडवून आणणें व अहिंसक सामुदायिक क्रांती हीं तीं साधनें होत.

सशस्त्र क्रांतिवाद ही गुलामगिरी जीवनांतील स्वाभाविक प्रतिक्रिया आहे. ज्या ज्या वेळीं अन्याय हाच धर्म होतो, प्रतिकाराचे सर्व वैध मार्ग खुंटलेले असतात, जीवन जिवंतपणें स्वाभिमानानें जगणेंच अशक्य होअून

बसतें त्या त्या वेळीं समाजांत वासुदेव बळवंत, चाफेकर बंधू निर्माण होत असतात. ते अन्यायाच्या प्रतिकारार्थ आपल्या आयुष्याची कुरवंडी करतात व या त्यांच्या बलिदानांतूनच क्रांतिकार्य वाढूं लागतें.

दि. १८-४-१८९८ रोजीं दामोदरपंत चाफेकर हातांत गीता घेऊन फांशीं गेले. 'स्वदेशाच्या छळाचा सूड घेऊन चाफेकर फांसावर चढले, त्यांच्या प्राणज्योतिनें जातां जातां चेतविलेली शत्रूजयवृत्ति, यज्ञ कुंडांत समिधे मागून समिधा टाकून अशीच भडकावीत नेणें असेल तर त्याचें दायित्व आपल्यावरहि पडत आहे.' हा विचार बाल विनायकाच्या मनांत बळावूं लागला. व वयाच्या १५ व्या वर्षीच या बाल वीरानें देवीपुढें शपथ घेतली.

'देशाचें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं सशस्त्र क्रांतीचा केतु उभारुन मारतां मारतां मरेतों झुंजेन' अशा आशयाची ती प्रतिज्ञा होती. यावेळीं बाल शिवाजीनें रोहिडेश्वराच्या देवालयांत घेतलेल्या प्रतिज्ञेचे चित्र डोळ्यासमोर उभें न राहिलें तरच नवल.

'अभिनव भारत' या क्रांतिकारक संस्थेचा उगम या प्रतिज्ञेंतच झाला. ते म्हणततात ' क्रांतिवादाचें तत्व हा केवळ भावनांचा उन्माद नव्हता. हौसेनें नव्हे तर निरुपाय म्हणून सशस्त्र युद्धाचा अंगिकार करणें आवश्यक होतें तीस कोटि लोकांच्या या महान राष्ट्राला मृत्यूच्या तावडींतून वाचविण्यासाठीं, हा राष्ट्रीय पारतंत्र्याचा रोग नष्ट करण्यासाठीं अगदीं अपरिहार्य म्हणून स्वत:वर नि राष्ट्रावर अशी शस्त्रक्रिया करणें आणि त्या परकीय रोगजंतूंस आणि रोगग्रंथीस कापून टाकणें हें नुसतें क्षम्यच नव्हे तर नीतिशास्त्राप्रमाणें अत्यंत पवित्र होय . . . . . म्हणून सशस्त्र क्रांतीचा आम्हीं बेलभांडार उचलला."

क्रांतिकारकांकडून किंवा सैनिकी-क्रांतीतून हुकुमशाही आणण्याचें सावरकरांचें धोरण कधींच नव्हते. सावरकरांनीं आपल्या क्रांतिकल्पनेंत

लोकशाहीचें बाह्य स्वरूप निश्चित मान्य केलें होतें. १९०७ साली संस्थानिकांना अुद्देशून काढलेल्या सुप्रसिद्ध पत्रकांत ते म्हणतात

" भारतमाता अेकदां स्वत्वसंपन्न झाली व स्वतंत्रपणें नांदू लागली कीं त्यात्युत्तर कालांत आपलें जीवन कसें चालावें हें ठरविण्यासाठीं अवश्य असणारी घटना तिच्याच शब्दानुसार ठरेल, तिच्या व्यतिरिक्त कोणीहि ती घटना ठरवूं शकणार नाहीं . . . . . हिंदी राष्ट्राच्या सार्वभौम सरकारचा प्रमुख म्हणून अध्यक्ष काम करील कीं तें काम राजा पाहील हे क्रांतीचा विकास कसा होईल यावर अवलंबून राहील; त्याच्या तपशिलांत आज लक्ष घालण्याचें कारण नाहीं . . . . भारतमाता स्वतंत्र झाली पाहिजे ती अेकरूप व अविभक्त राहिली पाहिजे व तिची अिच्छा राजमुकूट धारण करणाऱ्या स्वरूपांत व्यक्त होवो अगर स्वतःच्या पावन मूर्तीवर लोकमत शासनपद्धतीचा निदर्शक असा शेला धारण केलेल्या रुपांत तिचा आविष्कार होवो, कांहींहि घडलें तरी तें सारखेंच आहे. "

ज्यावेळीं क्रांतिकारकांचा ध्वज ठरविला त्यावेळीं सावरकरांनीं कामाबाअीना असें स्पष्टपणें लिहिलें होतें कीं स्वतंत्र हिंदुस्थानचा खरा ध्वज त्याची घटनासभा ठरवील. आपला ध्वज हा तात्पुरता आहे. अशा प्रकारें लोकशाहीच्या बाह्यस्वरूपापासून ते लोकशाहीच्या अुदात्त नीतीपर्यंत सर्व अंगोपांगाचा स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं अुत्कटतेनें पुरस्कार केला आहे.

परदेशांत असतांनां सेनापति बापटांसारख्या क्रांतिकारकांबरोबर आपण कोणत्या प्रतिज्ञा घेत असूं तें खालील शब्दांत तात्यांनीं प्रकट केलें आहे.

१) अेकत्रित व अखंड हिंदुस्थान हाच आमचा देश.

२) शक्य त्या मार्गांनीं मातृभूमि स्वतंत्र करूं अशीच भावना आम्ही ठेवूं ब्रिटीश हिंदुस्थान फ्रेंच हिंदुस्थान पोर्तुगीज हिंदुस्थान अशीं नांवें अैकलीं कीं आमच्या अंगांतील रक्त अुसळत असे.

३) हिंदी ही आमची राष्ट्रभाषा देवनागरी ही लीपी.
४) लोकसत्तात्मक राज्यपद्धति.

सर्व मानवजात सुखासमाधानांत नांदली पाहिजे नि जोपर्यंत हा समाज परकीय सत्तेच्या पुढें नम्र झालेला आहे, तोंपर्यंत ती सुखांत नांदणें अशक्य आहे अशी तात्यारावांची विचारसरणी असल्यामुळें त्यांची भारतीय स्वातंत्र्य-लालसाही निःस्वार्थ नि अुदात्त स्वरुपांत प्रकट होते.

नवभारताचे सर्व अर्थानें सावरकर हेच द्रष्टे आहेत. या देशांत संपूर्ण स्वातंत्र्याचा पहिला पुरस्कार अुघडपणें त्यांनींच केला. त्यासाठीं राजसिंहानाची अदला बदल करण्याचें अेकमेव साधन जें क्रांति त्यास अखिल भारतीय संघटित स्वरूप यांनींच दिलें. परतंत्र भारताचें आंतरराष्ट्रीय राजकारण खर्‍या अर्थानें प्रथम तेच खेळले.

ज्या तात्यारावांनीं आपल्या तेजस्वी क्रांतिकारक संघटनेचें जाळें पुढें विश्वभर विणलें त्याचें बीज दि. १-१-१९०० रोजीं स्थापन केलेल्या मित्र मेळयांत होतें. श्री शिवजयंत्युत्सव नि गणेशोत्सव मोठ्या धूमधडाक्यानें साजरे करण्यांत आले. २२-१-१९०१ रोजीं व्हिक्टोरिया ख्रिस्तवासी झाली. दुःखप्रदर्शनाच्या ठरावार चर्चा करतांना सावरकरांनीं 'राजा असो कीं राणी असो ती कोणाची हा प्रश्न आहे. अिंग्रजांची राणी म्हणजे आपल्या शत्रूची राणी ! अशा प्रसंगी राजनिष्ठा व्यक्त करणें ही राजनिष्ठा नव्हे गुलामगिरीची गीता आहे' अशा आशयाचे विचार व्यक्त केले. अेडवर्ड बादशहास आयुरारोग्य चिंतून राजनिष्ठा व्यक्त करण्याच्या अुत्सवदिनीं 'तुमची राष्ट्रमाता ज्यानें बटीक केली त्या राजाचा अुत्सव म्हणजेच तुमची स्वतंत्रता ज्या दिवशीं मेली त्या दुर्दिनाचा वाढदिवस. परराष्ट्राशीं राजनिष्ठा म्हणजेच स्वराष्ट्राशीं द्रोह' अशीं हस्तलिखित पत्रकें भिंतीवर दिसूं लागलीं.

पुढें लवकरच तात्यांचें लग्न झालें आपल्या संकल्पित क्रांतिकार्याला

विवाहबंधन अडवूं शकणार नाहीं असा त्यांचा विश्वास होता. आपल्या आत्मचरित्रांत ते म्हणतात, 'कर्तव्याचें रणशिंग फुंकलें' जातांच पत्नीसाठीं, पुत्रासाठीं नि मातेसाठीं मला बलिदान करतां येणार नाहीं असें निमित्त जो पुढें करतो तो बहुधा त्या सर्वांच्या मोहापेक्षां आंतून स्वतःच्या प्राणांच्या मोहानेंच मरणास सिद्ध नसतो.'

नाशिकचा अभ्यासक्रम संपवून सावरकरांनीं १९०२ मध्यें फर्ग्युसन कॉलेजमध्यें आपलें नांव घातलें. सावरकरांच्या भोवतीं मित्रपरिवार हा सदाचाच असे तालमीत जाऊन नियमितपणें व्यायाम करण्याबाबद सावरकरांचा कटाक्ष असे. ते रोज २०० जोर नि ३०० बैठका काढीत असत. पुढें जप्त झालेली तरवीर तानाजीचा नि बाजीप्रभूचा पोवाडा नि अनेक स्फुट काव्यें त्याच काळांत निर्माण झालीं. याच सुमारास विदेशी कपडयांच्या केलेल्या गाजलेल्या होळीमुळें अँग्लोइंडियन पत्रकारांचीं डोकीं दुखूं लागलीं.

भारत मातेच्या हिंदुसंततीच्या संतोषाखातर कांहीं अहिंदूना भारतांत स्थान मिळालें असलें तर तें औदार्य होय, अहिंदूंना तें स्थान हक्कानें मिळालें नाहीं हे विचार त्यानीं याच काळांत पुढीलप्रमाणें मांडले आहेत.

'तीस कोटि लेकरांनीं (भारतमाता) पुत्रवती आहे. अितर स्त्रियांचीं लेकरें आमच्याशीं खेळण्यासाठीं आलीं असतांना, केवळ आम्हां लडिवाळ पोरांचा आग्रह पाहून या आर्यमातेनें त्या परकीयांच्या लेंकरांना अुदार अंतःकरणानें जरी कांहीं वेळ तिच्या अंकावर आम्हांबरोबर बसूं दिलें असलें तरी तें केवळ औदार्यानें होय. हक्क म्हणून नव्हे.

पंडित शामजी कृष्णवर्माकडे धाडलेल्या शिफारसपत्रांत सावरकरांविषयीं लोकमान्य टिळक म्हणतात.

"When there is a rush like that, it is no use to recommend any one particularly to your notice. But still I may

state that among the applicants, there is one Mr. Savarkar from Bombay who graduated last year and whom I know to be a spirited young man, very enthusiastic in the swadeshi cause, so much so that he had to incur the displeasure of the Fergusson College authorities last year.He has no mind to take up Government Service at any time and his moral character is very good (13-3-1906)"

जुलैच्या प्रारंभीं सावरकर लंडनमध्यें पोहोंचले. ११ मे १९०७ हा दिन हा १८५७ सालच्या क्रांतिकारकांचा अर्धशतसांवत्सारिक स्मृतिदिन म्हणून साजरा करण्याचें सावरकरांनीं ठरविलें. विहारी पत्रांत लंडनच्या बातमीपत्रांच्या शेवटीं पुढील वाक्यें आढळतात. "कानपूरचें स्मरण फक्त अिंग्रजांनांच होतें असे नाहीं. तें लंडनमधील हिंदी लोकांनाहि होतें. गेल्या मे ११ ला येथील हिंदी लोकांनीं या सत्तावनच्या स्वातंत्र्य संग्रामाचा सुवर्णमहोत्सव साजरा करण्या-साठीं सभा बोलाविली होती तींत या संग्रामांत कामास आलेल्या देशवीरांचें भजन पूजन करण्यांत आलें.

लंडनमधील अभिनव भारताच्या या समारंभानंतर सेनापति बापट लौकरच बॉम्बविद्या हस्तगत करण्यासाठीं पॅरिसला रवाना झाले. जर्मनींत झालेल्या आंतरराष्ट्रीय सोशॅलिस्ट कांग्रेसमध्यें अभिनव भारताचे सदस्य बॅ. राणा व मॅडम कामा यांनीं स्वतंत्र भारताचा ध्वज फडकाविला व हिंदुस्थानची बाजू मांडली. बॉंब फॉर्म्युला लवकरच हिंदुस्थानांत पाठविण्यांत आला. मुझफरपुर येथें तेथील डि. मॅजिस्ट्रेट किंग्जफोर्ड यांच्यावर म्हणून पहिला बॉंब टाकण्यांत आला. पण त्याचा तडाखा गाडीच्या घोंटाळ्यामुळें दोन स्त्रियांना बसला. १०-५-१९०८ रोजीं सत्तावनच्या स्वातंत्र्ययुद्धाचा वाढदिवस मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. त्यानिमित्त प्रसिद्ध केलेलें 'हे हुतात्म्यानों' हें पत्रक फारच गाजलें.

दि. १ जुलै १९०७ रोजीं मदनलाल धिंग्रानीं गोळी झाडून कर्झन

म. ग्रं. स. सार्व.
जिल्हा वाचनालय

वायली याचा वध केला. यामागची भूमिका स्पष्ट करतांना धिंग्राजी आपल्या सुप्रसिद्ध 'आव्हान' या पत्रकांत म्हणतात,

"I believe that a nation held in bondge with the help of foreign byanets is in a perpetual state of war. Since open battle is rendered impossible to a disarmed race I attacked by surprise. Since guns were denied to me I drew forth my pistol and fried.

अिंग्लंडमधून भारतांत पुस्तकांतून व अन्य प्रकारें सावरकर पिस्तुलें पाठवितच होते. याच सुमारास १८५७ चें स्वातंत्र्यसमर हें पुस्तक लिहून प्रसिद्ध करण्यांत आलें. Indian Unrest या प्रसिद्ध पुस्तकाचे लेखक सर व्हॅलेन्टा॰ अीन चिरोल यानीं या पुस्तकाविषयीं पुढील प्रशास्तिपत्रक दिले आहे.

A very remarkable history of the mutiny combining considerable research with the grossest perversion of facts and great literory power with the most savage hatred

१८५७ सालचें स्वातंत्र्यसमर हें पुस्तक जणूं प्रत्येक क्रांतीवीराची स्वातंत्र्यगीताच झाली होती. हें पुस्तक लगेच जप्त करण्यांत आलें. हुतात्मा भगतसिंग यांनीं या पुस्तकाच्या हजारों प्रती गुप्तपणें छापल्या. नेताजी सुभाषचंद्र बोसांनीं या पुस्तकाच्या हजारों प्रति छापून आपल्या सैन्यांतील सनिकांना वाटून टाकिल्या. कित्येकांनी या पुस्तकाची दुर्मिळ प्रत आपणांस मिळावी म्हणून १००-१५० रुपये खर्च करावयासहि मागेंपुढें पाहिलें नाहीं. वाक्यांतील प्रत्येक शब्द क्रांतीच्या ज्वालेची जणूं काय ठिणगीच, वाक्य म्हणजे ज्वाला व पुस्तक जणूं काय परकीय सत्तेला रसातळास नेण्याचा दिव्य संदेश देणारा युगपुरुषच होय.

दि. २१-१२-१९०९ रोजीं रात्रीं विजयानंद चित्रगृहांत अनंतराव कान्हेरे यांनीं पिस्तुल झाडून नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याचा वध केला. अिंडिया हाअुसमधील पुन्हीचा आचारी चतुर्भुज यांजकडून ज्या पिस्तुलानें जॅक्सनचा

खून झाला तें सावरकरांनीं पाठविलेल्या २० पिस्तुलांपैकीं अेक आहे अशी माहिती सरकारला मिळाली. पॅरिसहून सावरकर दि. १३-३-१९१० रोजीं व्हिक्टोरिया स्थानकावर अुतरतां क्षणींच त्यांना अटक करण्यांत आली. हिंदुस्थानांत आणण्यासाठीं सावरकरांना घेअून 'मोरिया' आगनांव निघाली. दि. ८ जुलै १९१० रोजीं सावरकरांनीं पोर्टहोलमधून समुद्रांत अुडी घेअून फ्रान्सचा मार्सेलीसचा किनारा गांठला. फ्रेंच पोलिस अधिकाऱ्यास लांच दिल्यामुळें ब्रिटीश अधिकाऱ्यांना सावरकरांना पकडतां आलें. पुढें त्या अधिकाऱ्यास लांच घेतल्याबद्दल शिक्षाहि झाली. हेगच्या न्यायालयानें पक्षपाती निर्णय दिल्यामुळें सावरकरांना त्यांचें स्वातंत्र्य परत मिळालें नाहीं.

आपल्या निकालपत्रांत 'अभिनव भारत' या क्रांतिकारक संस्थेचीर शियांतील क्रांतिकारक सस्थांशीं न्यायमूर्तीनी केलेली तुलना महत्वाची आहे.

There is evidence ....... which indicates that the association aimed at some sort of orgnisation founded upon the model of Revolutionary societies in Russia. The suggested methods of preparation for war are the purchase and storing of weapons in neighbouring countries to be used when opportunity should occur the opening of many very small but secret factories at some distance from one another for the manufacture of weapons clandestinly in the country seeking independence and the purchase by secret societies of weapons in other countries to be secretry imported in merchantships

'Oh Martyrs' या पत्रकांतील पुढील अुताऱ्याकडे लक्ष वेधून न्यायमूर्तीनीं आपण दिलेल्या शिक्षेचें खालीलप्रमाणें समर्थन केलें आहे.

The war begun on the 10th of May 1857 is not over

on the 10th of May 1908, nor can it ever cease till a 10th May to come sees the destiny accomplished.

'We find the accused guilty of the abetment of waging war by instigation, by the circulation of printed matter inciting to war, the providing of arms and the distribution of instruction for the manufacture of explosives...... we also find him guilty of conspiring with others of ths accussed overawe, by criminal force or show of criminal force the Government of India and the Local Government नि याबद्दल सावरकरांना जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा देण्यांत आली जॅक्सनच्या खुनाला आरोपीनें मदत केली याहि आरोपाबद्दल सावरकरांना दुसरी जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा ठोठावण्यांत आली.

ह्या शिक्षा ठोठावण्यांत आल्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं पुढील संस्मरणीय अुद्‌गार न्यायालयांत काढले.

I am prepared to face ungrudgingly the extreme penalty of your laws in the belief that it is through sufferings and sacrifice alone that our beloved Motherland can march on to an assured if not a speedy triumph.

सावरकर अंदमान येथील कारागृहांत दि. ४–७–१९११ रोजीं प्रविष्ट झाले. छिलका कुटणें म्हणजे नारळाचीं सोडणें कुटून काथ्याचें तंतू बनविणें हें काम करतांना हाताचीं सालटीं निघून हात रक्तबंबाळ होअून जात. काथ्या सुद्धां वळावा लागे. सर्वांत कष्टप्रद असें तेलाच्या घाण्याचें काम होतें 'सकाळीच अुठतांच लंगोटी नेसून खोलीत बंद व्हायचें, आंत घाण्याची दांडी असून खोली-बाहेर तेल पडेल अशी व्यवस्था केलेली असे. ती लोखंडी दांडी हाताने चाक फिरवितात तशी फिरवावयाची, खोबरें त्या अुखळींत पडलें कीं ती अित[illegible]

जड होओी कीं कसलेले हमाल देखील तिच्या वीस फेऱ्या फिरवितांना रडकुंडीस येत असत.' तेलाचें ठराविक माप पुरें केलें पाहिजे यासाठीं बंदिवानांचा कल्पनातीत छळ करीत असत.

या कष्टमय जीवनांतहि तात्यारावांची कल्पकता कायम राहिली. राजबंदिवानांची संघटना, त्यांचें ज्ञानार्जन, त्यांचें राजकीय शिक्षण अित्यादी अनेक गाष्टी त्यांनी विविध प्रकारें सुरूं केल्या. जवळ जवळ ९०० ओळीचें 'कमला' काव्य त्यांनीं काटयानें क्वचित प्रसंगीं खिळयानीं चुना लावलेल्या भिंतींवर लिहून काढलें होतें. राजबदिवानांनीं कोठडया बदलल्या कीं सावरकरांनीं लिहिलेल्या विविध ज्ञानाचा लाभ त्यांना होत असे. अेकमेकांना कळावें म्हणून बेडयांच्या वाळयांतून अुमटणारे आवाज आधारभूत समजून अेक सांकेतिक भाषा ठविण्यांत आली. तात्यारावांनीं ही परीभाषा प्रथम अिंग्रजींत निश्चित केली. त्यांचे जेष्ठ बंधु बाबारावांनीं पुढें या ध्वनिभाषेचें देवनागरींत रूपांतर केलें

अंदमानांतील पठाण अधिकाऱ्यांच्या प्रभावामुळें अल्पवयी हिंदु बंदिवान मुसलमान बनत असत. सर्व अडचणींना धाब्यावर बसवून तात्यारावांनीं अंदमानांतहि १९१३ पासून शुद्धिकार्य सुरू केलें. कमला या दीर्घ काव्याप्रमाणें वेडी कोठडी कील् सायंघंटा आदि चुटकेवजा कविता व चांदोबा चांदोबा भगलास कां ह्या गंमतीदार कविता तात्यारावांनीं अंदमानांत लिहिल्या.

राजा महेंद्रप्रताप, लाला हरदयाल, वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय श्री भूपेंद्रदत्त आदि क्रांतिकारकांनीं पहिल्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर बर्लिनमध्यें भारतीय स्वतंत्र्य समिति स्थापन केली. अंदमानांतील राज बंद्यांना मुक्त करण्याच्या योजना 'अेम्डन' या जर्मन युद्धनौकेनें आंखलेल्या होत्या. या सर्व योजनांचा सुगावा ब्रिटीश सेनाधिकाऱ्यांना योग्य वेळीं लागून प्रतियोजना आंखण्याच्या कामीं यश प्राप्त झाल्यामुळें यांतून कांहिच निष्पन्न झालें नाहीं. १९१५ च्या सुमारास लाहोर कटाचा निकाल लागून कर्तारसिंग, जगत्‌सिंग, पिंगळे प्रभृति

सात जणांना फांशीं देण्यांत आले व परमानंदशचींद्रनाथ सन्याल आदींना अंद-मानला धाडण्यांत आले.

१९१८ सुमारास सावरकरांची प्रकृती फारच खंगली. अेका वऱ्षांत त्याचें वजन ११९ पौंडांवरून ९८ पौंडांपऱ्यंत अुतरलें. २४–१२–१९ रोजीं राजबंदीविमोचनासंबंधीचा जाहिरनामा प्रसिद्ध झाला, घोषणापत्रकानुसार कांहीं राजबंदींची मुक्तता करण्यात आली. त्यांतून सावरकरांना वगळण्यांत आले होते. १९२० च्या जुलै महिन्यांत सावरकरांना कारकुनी काम करण्याची संधि देण्यांत आली. शेंवटीं १०–२–२१ रोजीं त्यांची अंदमानांतून मुक्तता झाली अलिपूर नंतर त्यांना रत्नागिरीच्या कारागृहांत ठेवण्यांत आलें याच सुमारास सावरकरांनीं हिंदुत्व व माझी जन्मठेप हीं पुस्तकें लिहून काढलीं. दि. ६-१-२४ रोजी सावरकरांची पांच वऱ्षे राजकारणांत भाग घेणार नाहीं व रत्नागिरी सीमेच्या बाहेर जाणार नाहीं या निऱ्बंधावर (त्यांची) मुक्तता करण्यांत आली.

परंतु वरील निऱ्बंधांमुळेंच तात्यारावांनीं अेका नवीन संग्रामास सुरवात केली. हिंदूच्या अपकऱ्षांस कारणीभूत झालेल्या, देशहितास अत्यंत विघातक ठरलेल्या, हिंदुसमाजाचा देह पोखरणाच्या जन्मजात पोथीजात जातिभेदाचा अुच्छेद करून गुणजात जातिभेदाचा अुद्धार करण्यासाठीं सावरकरांनीं रणशिंग फूंकलें.

जातिभेद हा चतुष्पाद प्राणी असून मुख्यतः ज्या पायांवर तो अुभा आहे ते चार पाय म्हणजे व्यवसायबंदी स्पऱ्शबंदी, रोटीबंदी नि बेटीबंदी हे तोडले म्हणजे जातिभेदाचें बूड कोसळलेंच. याबरोबरच वेदोक्तबंदी सिंधुबंदी नि शुद्धिबंदी या कशा मोडाव्यात याबद्दल कार्य तात्यारावांनीं सुरूं केलें. या रूढ समजुतीवर सावरकरांनीं कडाडून हल्ले चढविले. सहभोजनाची तर त्यांनीं आघाडीच अुघडली पतित पावन मंदिर बांधविण्यांत आलें. अखिल हिंदु गणेशोत्सव

सुरु करण्यांत आला. प्रत्येक सहभोजनाच्या आरंभी 'जन्मजात जात्युच्छेदनार्थ सहभोजनं करिष्ये' या मंत्राचा अुद्घोष वारंवार करण्यांत आला.

" वरं जनहितं ध्येय केवला न जनस्तुतिः ' हें तात्यांचे ध्येयवाक्य असल्यामुळें त्यांनीं कित्येकदां सार्वजनिक निग्रहहि सहन केले. जनहित बुद्धि हाच अेक स्थिर विचार मनांत ठेवून ते कार्य करीत असल्यामुळें तसें करतांना यांनीं लोकमताची पर्वा केली नाहीं.

ज्या शुद्धिसंघटनेचा पाया त्यांनीं अंदमानच्या अंधेऱ्या कारागृहांतच घातला होता त्यालाच रत्नागिरीच्या मर्यादित क्षेत्रांत का होईना पण चालना मिळाली. भाषाशुद्धि व लिपिशुद्धिचा पाया त्यांनीं याच ठिकाणीं घातला. स्वधर्मे निधनं श्रेयः' या गीतावचनामृताचा सातत्यानें मंत्रजागर केल्यामुळें मिशनऱ्यांचें धाबें दणाणलें· अस्पृश्यता नष्ट झाली. परधर्म प्रवेश थांबला आणि आतां या बलवान् अशा हिंदु राष्ट्राची प्रचंड आणि खंबीर अभेद्य अशी अेक राष्ट्रीय संघटना होणें जेव्हां आवश्यक होतें तेव्हां या सर्वासाठीं हिंदुत्व हा महान राष्ट्रीय ग्रंथ निर्माण झाला.

सिंधुबंदीमुळेंच आपल्या देशाची प्रगति खुंटली. हिन्दी सैन्य युरोपांत धाडण्यांत आलें ही फार महत्वाची गोष्ट आहे हे विचार १९१५ च्या वार्षिक पत्रांत अंदमानांतून खालील प्रमाणें व्यक्त करतात. 'लष्करी दृष्टचा पहिल्या प्रतीच्या सत्तेशीं लढण्यासाठीं सहस्रावधी हिंदी सैनिकांना युरोपांत जाण्याला परवानगी देण्यांत आली आहे हें अैकल्यामुळें माझ्या अंतःकरणांत आनंदाची संवेदना चमकली, आपल्या देशांतील पौरुष नष्ट झालें नाहीं ही केवढी परमेश्वराची कृपा ' आणि काय मौज आहे पहा ; परदेशाच्या प्रवासाला प्रोत्साहन देण्याची आम्ही पराकाष्टा करीत आलों व प्रतिवर्षीं दहाबारा माणसें परदेशीं गेलीं कीं आम्ही स्वतःला धन्यवाद देत आलों ' पण जें आम्हांला करतां आलें नाहीं तें आज परमेश्वरी योजनेनें घडलें आहे. सहस्रावधी हिंदु खुद्द सरकारी प्रोत्सा-

जिल्हा वाचनालय

हनानें समुद्रपार झाले आहेत . . . . परदेशाचा प्रवास हिंदुशास्त्रांना संमत आहे किंवा नाहीं या विषयींच्या शास्त्रार्थाचीं अंडीं अुबवीत पंडितांनीं खुशाल बसावें.' हा प्रवास संमत ठरो वा न ठरो, हिंदूंनीं सिंधुबंदीची रुढी मोडली आहे. या रूढिचा अुच्छेद करून समुद्रपार होतां होतांत्यांनीं अेका युगाचें अुड्डाण केलें आहें.

यंत्र हा शाप नसून तें मानवांना वरदान आहे बेकारी हा यंत्राचा दोष नसून विषम वांटणीचा दोष आहे. राष्ट्रानें यंत्रशील व्हावें. विज्ञानाचें अधिष्टान समाजांत यावें. देशाला समाजवादी रचना पाहिजे. जमीनदारी नष्ट झाली पाहिजे परंतु मार्क्सच्या पोथीजात समाजरचनेवर विसंबून रहाणें योग्य नव्हें या भूमींत आर्थिक व सामाजिक समता हीं ह्या देशांतील सामाजिक परीस्थिती-नुसार वाढलीं पाहिजेत. हे विचार कोणाला अुद्‌बोधक वाटणार नाहींत !

विज्ञानाचा पुरस्कार तात्यारावांनीं मोठ्या हिरीरीनें केला. मनूनें राज धर्मांत युद्धनीतीचा सनातन धर्म म्हणून जो सांगितला त्यांत चतुरंग दलाचा सविस्तर अुल्लेख आहे. पण तोफखान्याचा व वैमानिक दलाचा नामनिर्देशहि नाहीं म्हणून जर आमचे धर्मसंघ जर आजहि केवळ धनुर्धरांना पुढें घालून आठघोडी रथ सजवून युद्धावर गेले तर पांचजन्याखेरीज त्यांना दुसरें काय करतां येअील ?

आसिंधु-सिंधुपर्यंता । यस्य भारतभूमिका ।
पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिति स्मृतः ।।

अशी सुस्पष्ट, शीख बुद्ध जैन यांना समाविष्ट करून घेणारी हिंदुत्वाची व्याख्या सावरकरांनींच प्रथम अुद्‌घोषिली. याचीच हिंदुसमाजाला अत्यंत निकड होती.

लोकमान्य टिळक यांच्या मृत्यूनंतर भारतीय राजकारणाला जें चुकीचें वळण लागलें, अदूरदृष्टि नेत्याचें नेतृत्व स्वीकारावें लागलें. त्यामुळें अितक्या

वऱ्षांच्या गुलामगिरीमुळें जो आघात हिंदुसमाजावर होऊं शकला नाहीं. तो आतां या दुऱ्बळ, भ्याड विचारशून्य, नादान नेतृत्वामुळें झाला. यामुळें आपला कोण व परका कोण हें न ओळखण्याइतकी हिंदुसमाजाची मति कुंठित झाली. डॅ. गांधींच्या नेतृत्वाखालीं चाललेलें कॉंग्रेसचें कार्य हें जणूं मुसलमानार्जिणे पणा आत्मविस्मृति व लांगूलचालन यांचें प्रदऱ्शनच होतें. मुसलमान हे राष्ट्राचे शत्रु आहेत हें पूऱ्णपणें ओळखल्यावर आत्मविस्मृत समाजाला जागृत करण्या-साठीं हिंदुत्वाचें रक्षण व्हावें, अखंड हिंदुस्थानचें स्वातंत्र्य प्राप्त व्हावें म्हणून निऱ्बंधांतून मुक्त होतांच स्वा. सावरकरानीं हिंदुराष्ट्राच्या ऐकतेसाठीं व हिंदु-त्वाच्या रक्षणासाठीं हिंदुसभेचें नेतृत्व स्वीकारून राष्ट्राला माऱ्गदऱ्शन करणें हेंच योग्य होतें. 'याल तर तुमच्यासह न याल तर तुमच्यावांचून पण जर विरोधाल तर तुम्हांलाहि विरोधून हिंदुराष्ट्र आपलें भवितव्य घडवीलच घडवील, असें आत्मविश्वासपूऱ्वक सांगणाच्या नेत्याचीच हिंदुसमाजाला आवश्यकता होती

स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं मुसलमानी राजकारणाचें निऱ्भीड समीक्षण केलें व हिंदुसमाजाला वारंवार बजावून सांगितलें ( १९३७ )

I warn the Hindus that the Mohamedans are likely to prove dangerous to our Hidu Nation and the existence of a common Indian state even if and when England goes out. Let us not be stone blind to the faet that they as a community still continue to cherish pratical designs to establish a Moslem rule in India. Let us work for harmony let us hope for the best, but let us be on our guard

हें त्यांचें समीक्षण चुकीचें होतें असें कोण बरें म्हणेल

सावरकर आत्मविश्वासपूऱ्वक म्हणतात कीं माझ्या आयुष्यांत असा कांहीं नियमच आहे कीं मी जें आज सांगतों तें दहा वऱ्षानंतर लोकांना पटतें-मासी दहा वऱ्षें वाट पहाण्याची तयारी आहे.

१९३७ सालींच युद्धाची लक्षणें दिसू लागलीं होतीं. १९३८ सालीं सुभाषचंद्र बोस कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. अपल्या अध्यक्षीय भाषणांत आगामी युद्धाचा अुल्लेख करून त्यावेळीं स्वातंत्र्यासाठीं नव्या लढ्याची संधी येणार हें सुचविले होते. गुलाम राष्ट्राच्या आयुष्यांत युद्ध ही अशी अेकच संधी असते की ज्या संधीचा फायदा घेअून अुठावणी करता येणें शक्य असतें. अिग्लंडचें जें संकट ती आपली पर्वणी असें नेताजी व सावरकर या दोघांचेंहि मत असल्यामुळें देशांत अशा प्रकारची अुठावणी व्हावी हें दोघांनीही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रीत्या सुचविलें होते.

१९३९ सालीं सुभाषबाबूंनीं कॉंग्रेस सोडली त्यांला कॉंग्रेसनें ब्रिटीश सत्तेशी अखेरचा लढा द्यावा असें वाटत होते. हिटलरला युरोपांत लागोपाठ विजय मिळत होते आज ना अुद्यां जपान युद्धांत पडणार हेंही स्पष्टच होते. सुभाषबाबू व सावरकर यांची या सर्व परीस्थतीवर चर्चा झाली. सुभाष बाबू १९४१ च्या जानेवारींत हा देश सोडून गेले. या सर्व गोष्टी दूरवर निश्चित केल्यावर मगच स्वातंत्र्यवीर सावरकर यांनीं सैन्यांत शिरा असा संदेश दिला.

१९३८ मध्यें मुंबअी येथील २३ व्या साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदा-वरून भाषण करतांना 'लेखण्या मोडा बंदुका हातांत घ्या' हा संदेश तात्या-रावानीं दिला. नुसत्या लेखणीच्या अगर तत्वज्ञानाच्या बळावर राष्ट्राची प्रतिष्ठां प्रस्थापित होअु शकत नाहीं. त्या तत्वज्ञानाचा प्रभाव नि विजय त्या लेखणीला धार आणि प्रभाव तेव्हांच पडेल मी जेव्हां त्या ज्ञानाच्यानि लेखणीच्या पाठीशीं बंदुकीचे सामर्थ्य असेल. साहित्य हें आपल्या राष्ट्रीय जिवनाचें अुपांगच असल्यामुळें राष्ट्रीय जिवन सुरक्षित असेल तरच साहित्य सुरक्षित राहूं शकेल आणि म्हणून राष्ट्रीय जीवनाचें संरक्षण हें आपल्या साहित्याचे ध्येय असले पाहिजे.

जर्मनीच्या पुनरुत्थानास प्रारंभ करतांना हिटलर आपल्या अनुयायांस म्हणत असे 'To recover the Nation from the present destruction you must not ask me how to manufacture arms but how to inculate that spirit that makes the people capable of bearing arms. अर्थात अशी वीरवृत्ती तेजस्वी व जिवंत साहित्यद्वारांच होअु शकते. भगवद्गीताच अर्जुनाला कार्यप्रवण करूं शकली. लेखणी कार्यप्रवण करण्याअितकी प्रभावी असेल तरच.

सावरकरांच्या सैनिकी करणामांगे दुसरा आणखी अेक हेतु होता. १९३० सालींच मुस्लीम लीगचें प्रस्थ देशाच्या राजकरणांत माजूं लागले होते. मुसलमानी संस्थानें मुस्लीम लीगच्या चळवळींत जातीवर गेली. व हिंदुना त्रास व मानहानी सोसावी लागली. १९३९ सालीं युद्ध सुरु झाल्यावर ब्रिटीशांशीं सूत जमवून मुसलमानानीं मोठ्या प्रमाणांत सैन्यात भरती होण्यास सुरवात केली. मुसलमानांनीं आपल्या राजकीय आकांक्षा पाकिस्तानच्या मागणीनें व्यक्त केल्या होत्या. यादवी युद्ध हें मुळीं त्यांचें धोरणच होते. ब्रिटीश सत्ता ज्या वेळीं गळीतगात्र होअील त्यावेळीं सैन्यात जर मुसलमान बहुसंख्य असतील तर पाकिस्तान जिकणें सुलभ जाअील अशी मुस्लीम लीगच्या नेत्याची खात्री होती.

सावरकरानीं सैनिकीकरणाची चळवळ सुरूं करून मुस्लीम लीगच्या नेत्यांना धक्का दिला. सावरकरांच्या चळवळीला अितकें यश आले कीं हजारों हिंदु सैन्यांत दाखल झाले. व सैन्यांत जें पूर्वी ६५ टक्के मुसलमान व ३५ टक्के हिंदु हें प्रमाण होते तें ६५ टक्के हिंदु व ३५ टक्के मुसलमान असें झालें.

१९४२ मध्यें अ. भा. हिंदुमहासभेच्या कानपूर येथील अध्यक्षीय भाषणांत सावरकरानीं त्यावेळच्या परिस्थितीचें योग्य निदान करून हिंदु-समाजाला सुस्पष्ट मार्ग दाखविला आहे. 'सध्याच्या युद्धांत ब्रिटन यशस्वी

५१ दा. क्र. ८४२४

होअून हिंदुस्थानचें सार्वभौमत्व त्यांच्याच हातीं राहील अशा भूमीकेवरच तूर्तचे आपले सर्व कार्यक्रम आंखलेले आहेत. या भूमिकेला धक्का देखील असें अद्याप कांहीं घडलेलें नाहीं. पण हिंदुस्थानच्या पूर्व सरसीमेवर जपानी सैन्य अद्याप खडे आहे आणि तें अद्याप म्हणण्या अितकें मागें हललेलें नाहीं. शिवाय जूट राष्ट्रांभोवतीं सध्या असंतुष्ट राष्ट्रांचा अितका मोठा जमाव आहे कीं त्यामुळें कोणीहि राजनीतिज्ञ सेनानी किंवा सर्वाधिकारी लढाअीचें निश्चित जातक आज वर्तवूं शकत नाहीं. म्हणून अशा स्थितींत युद्धमान राष्ट्रांपैकीं कोणाहि अेका प्रबळ गटाशी ज्याचें भवितव्य निगडीत आहे अशा हिंदुस्थानसारख्या राष्ट्रानें वारा येअील तशी पाठ फिरवण्याचें धोरण ठेवीलें पाहिजे.

काय वाटेल तें झालें तरी हिंदु संघटनेच्या ध्येयाला चिकटून रहा. तेंच तुम्हांला तारील आणि भवितव्याला तोंड देण्यास समर्थ बनतील. त्याचें सूत्र हेंच कीं ' हिंदूंचें सैनिकीरण आणि राजनीतीचें हिंदुकरण ' आजच्या परिस्थितीतहि हाच संदेश आचरणांत आणावयास नको काय ?

सैनिकीकरणामुळें भारत स्वतंत्र झाला हें अभिनव भारत सांगता समारंभांत विशद करून सांगताना स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणाले ' तुमच्या गीता पठनानें वा सूतयज्ञानें स्वातंत्र्य आलें नाही. क्रांतिकारक अेकेकटयानें झुजले. सैन्यानिशीं झुजले नि त्यांनीं त्यांचें राज्यशकट अशक्य करून सोडले म्हणून ते हिंदुस्थान सोडून चालते झाले अिंग्रजांचें मन बदळलें नाहीं या संबंधीं खोटा अितिहास शिकवूं नका. खरा अितिहास सांगा तरच योग्य मार्ग दिसून तुम्ही स्वातंत्र्यरक्षणार्थ समर्थ होअूं शकाल.

त्यावेळीं सैन्यांतील लोक बिथरले होते वि बाहेरील जनताहि बिथरली होती म्हणून अिंग्रजांना नवीन सैन्यभरती करणें अशक्य झालें. परदेशांतील व देशांतील जनता अेकरूप झाली हें ओळखून अिंग्रजानीं आमच्याशीं संधि केली पण संधि करावयास गेलेले आमचे पुढारी योग्य नव्हते म्हणून देशाची मोडतोड

झाली. इंग्रज भारत सोडून गेला तें सुखासुखी आणि हृदय परिवर्त्तनानें नाहीं तसें असतें तर जिब्राल्टर सिंगापूर सुवेझ आणि आफ्रिका येथें त्यांच्या सत्तेची मा तुरी आणि साम्राज्यशाहीचा नंगानाच कां बरें चालू आहे (११–५–५२)

२५ जून १९४४ ला सिंगापूर नभोवाणीवरून केलेल्या भाषणांत सैनिकी करणाच्या धोरणाबद्दल नेताजी सुभाषचंद्र बोसांनीं स्वातंत्र्यवीर सावरकरांचें पुढील शब्दांत अभिनंदन केलें आहे.

"When due to misguided political whims and lack of wisdom almost all the leaders of the Congress party are decrying all the soldires as mercineries it is heartening to know that Veer Savarkar is fearlessly exhorting youths of India to enlist in Armed forces. Those enlisted youths themselves Provide us with trained men from which we draw the soldiers of our Indian National Army. "

वरील सत्व विवेचनावरून असें निश्चितपणें दिसून येतें कीं स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा क्रांतिवादच, क्रांतिकारकांचें अेकेकट्यांचें प्रयत्न व संघटित प्रयत्न व लाला हरदयाळांपासून नेताजी सुभाषचंद्र बोसापर्यंत लढविण्यांत आलेले सशस्त्र लढे भारताला स्वातंत्र्य प्राप्त करुन देण्यास कारणीभूत झाले यांत तिळमात्र संशय नको

आणि या सत्वाचें चीज काय तर स्वातंत्र्यप्राप्तीनंतरहि सतत मानखंडना अवहेलना व अपमानास्पद जिणें परकीय सरकारानीं बळजबरीनें जप्त केलेली भगूरची मालमत्ता परत देऊन स्वातंत्र्यवीरांचा सन्मान करणें तर दूरच. याविषयीं सावरकर म्हणततात जेथें पंजाब, सिंध, बंगाल, गेले तेथें या टीचभर मालमत्तेचे हो काय ? परकीय सत्ताधिकाऱ्यांच्या प्रेरणेनें हिरावून घेतलेली B. A. ची पदवी त्याशिवाय D Lit ची पदवी स्वातंत्र्यवीरांना अर्पण करून आपल्या विद्यापिठाचा गौरव वाढविणें स्वातंत्र्यप्राप्तीनंतरहि

मुंबअी विद्यापिठाला जमलें नाहीं. परंतु गांधीखुनासारख्या खटल्यांत अेक आरोपी म्हणून खटला चालवून स्वातंत्र्यवीरांच्या अुज्वल चारित्र्यावर लांच्छनास्पद कलंक लावण्याचा प्रयत्न करण्यांतहि स्वतंत्र भारताच्या आजच्या सरकारनें पुढेंमागें पाहिले नाहीं. ब्रिटिशांचे खरेखुरे वारदार आहोंत हें भासविवण्यांत सध्याचें सरकार यशस्वी झालेहि असेल कदाचित. अर्थात या सर्व संकटातून स्यातंत्र्यवीर सावरकर सुखरुपणें तावून सुलाखून बाहेर पडले. परंतु देशाच्या स्वातंत्र्यवीरावर स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावरहि मानहानीचे प्रसंगाचें प्रत्याघात व्हावेत हें बघून कोणाचे मन अुद्विग्न होणार नाही बरे ?

मर्यादापुरुषोत्तम श्री रामचंद्राचे जीवन अंतापर्यंत अेकामागून अेक अेकामागून अेक ये ाऱ्या दुःखानीं व्यापून गेलें होते कीं आपल्या जीवनाच्या अंतिम क्षणीं त्यांनीं 'दुःखसवेदनाचैव रामे चैतन्यमाहितम' केवळ दुःख भोगण्यास ठींच नियतीनें रामाला सजीव स्थितीत ठेवलें आहे. असे अुद्गार काढले आहेत. आज श्री रामचंद्राअितक्याच यथार्थतेनें स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं हे अुद्गार काढावेत अशी वस्तुस्थिति आहे.

तात्यारावांनीं सांत्वन या कवितेंत स्वतःच्या जिविताचे प्रतिबिंब अुमटविलें आहे.

अनेक फुलें फुलतीं । फुलोनिया सुकोनी जातौ
कोणी त्यांची महती गणती ठेविली असे
परि जें गजेंद्रशुंडे अुपटिले । श्रीहरीसाठीं मेले
कमलफूल तें अमर झालें मोक्षदायी पावन

अैन तारुण्यांत अंगीकृत व्रताच्या अुद्यापनाच्या नादांत अनंत यातना भोगल्यावर, मायभूमीपासून वियोग झाला असतांना, मृत्यूचे पाश शरीराभोवती करकचून आवळले जात असतांना भारताचा हा स्वातंत्र्यवीर

मृत्यो । तूं ये यावयाप्रति ।
विचालाचि असशिल जरि ये सुखे

असें छातीठोकपणें सांगत आहे. हे पाहिलें म्हणजे या स्वातंत्र्यवीराच्या धैर्याला धन्यता दिल्याशिवाय कोणाच्यानेंहि राहवणार नाहीं.

सागरास ही कविता स्फुरतेवेळीं स्वातंत्र्यवीर सावरकरांची मनःस्थिती काय होती याचें निरंजन बाबू वर्णन करतात.

"अितक्यांत सावरकरांनीं अेक गाणें गुणगुणण्यास सुरवात केली ते अेकीकडे काव्य रचीत होतें व अेकीकडे ते म्हणत होते. गाणें मराठी असून त्यांत भारताच्या दीनवाण्या दास्याचें वर्णन होतें. आत्मविस्मृतीच्या पूर्णावस्थेंत जावून सावरकरांचें गीतगान चाललें होतें. अितक्यांत त्यांच्या डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहूं लागले; त्यांचा कंठ स्तंभित झाला. गाणें अपुरेंच राहिलें; अेखाद्या निष्पाप लेकरासारखे सावरकर कंठ मोकळा करून रडूं लागले.

केवळ आठ वर्षांत देशांतील तरुणांत किती मानसिक क्रांति झाली याचें वर्णन सावरकरांनीं पुढील श्लोकांत केलें आहे.

आसेतुपर्यंत अुचंबळला स्वदेश
वीराकृति धरिति टाकुनि दीन वेष
भक्तांचिया रघुपदीं झुलतात झुंडी
जाज्वल्य होयहि हुताशन यज्ञकुंडी

तात्यांच्या सर्व वाङ्मयांतून स्वधर्मप्रेम नि स्वदेशप्रेम यांचा संदेश प्रतिभासंपन्न वाणीनें अैकावयास मिळतो. त्यांच्या व्यक्तिमत्वांतला स्थायीभाव म्हणजे स्वातंत्र्यलालसा नि देशभक्ति.

आजवरच्या जीवनांत देशस्वातंत्र्याचा विचार आपण किती तळमळीनें करतों हें त्यांनीं पंडित शामजीकृष्णवर्मांना लिहिलेल्या पत्रांत व्यक्त केलें आहे. ते लिहतात, "स्वातंत्र्य ही राष्ट्राची नाडी आहे, ते राष्ट्राचें निश्वसित आहे असें मी समजत आलों आहे. बालवयापासून माझ्या तारुण्यांतील या

क्षणापर्यंत मी जर झोपेंत कशाचीं स्वप्नें पाहिलीं असतील आणि जागृतावस्थेंत कशाचा विचार केला असेल तर तो अेकाच विषयाचा होय. देशाच्या स्वातंत्र्याची झालेली हानी आणि तें स्वातंत्र्य परत मिळविण्याची शक्यता हा अेकच माझ्या चिंतनाचा विषय झालेला आहे.''

भारतास स्वातंत्र्य मिळालें. भारताचे दोन तुकडे करण्यांत आले. तरीहि अेका विजयी सेनापतीप्रमाणें मिळविलें हें निश्चितच कमी किंमतीचें नाहीं म्हणूनच आपण आज तीन चतुर्थांश भारत स्वतंत्र्य केला असे आनंदोद्गार काढून आपल्या घरावर राष्ट्रध्वज डौलानें फडकविला.

याच वेळेस स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं सांगितलें कीं 'आतांपर्यंत हिंदूंच्या अितिहासांत वायव्य सीमा आपल्या शत्रूच्या हातांत गेल्याचे अनेक प्रसंग घडले आहेत. आपल्यांत हिंमत असेल तर आपण हाच दुभंगलेला देश पुन्हां अेकदां दहा वर्षांत अखंड करूं' केवढा जबर आत्मविश्वास.

अजून पूर्णपणें भारत स्वतंत्र झालेला नाहीं. गोवा दमण येथील पोर्तुगीज राज्यकर्ते नि बंगाल, पंजाब, सिंध, काश्मीर येथील मुस्लीम राज्यकर्ते यांच्या ताब्यांतील भारताचा भूभाग अजूनहि आपणांस मुक्त करावयाचा आहे. म्हणजेच स्वातंत्र्यचळवळीचा अितिहास अद्याप पूर्ण झालेला नाहीं. भारताचे कांहीं भूभाग अद्यापहि परकीयांच्या ताब्यांत आहेत. जो पर्यंत स्वतंत्र होत नाहींत तोपर्यंत भारत स्वातंत्र्यलढे देतच राहील. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या मार्गदर्शनाखालीं हे लढे भारत यशस्वीपणें लढेल नि जेव्हां भारत संपूर्णतया स्वतंत्र होअील तेव्हांच भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा अितिहास लिहिला जाअील. स्वातंत्र्यवीर सावरकरांचें कार्य अद्यापहि पूर्ण झालेलें नाहीं नि तें चालूच रहाणार आहे.

आतांपर्यंतच्या स्वातंत्र्य लढ्यांतील स्वातंत्र्यवीरांचें स्थान अनन्यसाधारण होय यांत शंका नाहीं. त्यांचे समाजकारण, राजकारण अितिहास नि बुद्धिवाद यांच्यावरील विचार मूलगामी नि क्रांतिकारक आहेत. ज्यांच्या विचारांचा वि

दा. क. ५९२४



कार्याचा आधुनिक भारतावर परिणाम झाला आहे त्यापैकी सावरकर हे युगपुरुष होत.

१९५४ साली अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या पुणें शाखेतील विद्यार्थीवर्गापुढे भाषण करतांना तरुणांवर पडलेल्या जबाबदारीची जाणीव करून देतांना तात्याराव बोलले, ''स्वातंत्र्य मिळवून आपण कृतार्थ झालों आहोंत. हें स्वातंत्र्य भगीरथ प्रयत्न करून बळकट करा. माझ्या तरुण मित्रानों, तुम्ही कोणत्याहि पक्षाचे असा पण लक्षांत ठेवा कीं देशरक्षणाची जबाबदारी तुमच्यावर आहे. स्वातंत्र्य मिळतांच सोन्याचा पाऊस आकाशांतून पडेल, असें तरुणांनीं कधींहि मानूं नये. बंदिवासांतून बंदींतून सुटका होणें अेवढाच स्वातंत्र्याचा अर्थ. नि:शस्त्रीकरण, अर्थशोषण विस्कळीत समाज हेंच आपल्या राष्ट्राचें चित्र आहे. वाताहात झालेल्या सर्व गोष्टी पुन: स्थिरस्थावर करणें आणि देशाच्या वैभवाची वाढ करणें हीच तुमच्या शिरावरील जबाबदारी आहे. स्वातंत्र्याचा अुपभोग तुम्हांला तेजस्वीपणें घेतां आला पाहिजे. म्हणून विफलतेची भावना टाकून देअून, माझ्या मित्रानों, आतां आपापल्या देवता-समोर प्रतिज्ञा घ्या कीं 'माझ्या राष्ट्रावर जर परकीय आक्रमण झालें तर मी लढत लढत मरेन अुपवास करून मव्हे. आणि प्रतिज्ञेपूर्तीसाठीं तुम्हांस आमच्या पिढीपेक्षां तिप्पटीनें त्याग करावा लागेल.

खंडित भारत स्वतंत्र झाल्यावर आपत्तींच्या आघातांना न जुमानत वा राज्यकर्त्यांच्या खंडनद्रोहांतून अुद्‌भवलेल्या विकृततेची यत्किंचितही पर्वा न करतां 'सिंधवांचून हिंदु नाहीं, हे श्रोतवंनी , सुरसेविते. आम्ही तुला कधीं विसरु काय ? नाहीं भारत तर निदान महाराष्ट्र तरी तुला स्वतंत्र करीलच 'हा तेजस्वी मंत्र अुदघोषून जागृत होअूं लागलेल्या हिंदु राष्ट्राला पुनश्च स्पष्ट-पणें ध्येयदर्शन स्वातंत्र्यवीर सावरकरांनींच केलेलें आहे.

यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा। तत्तदेवाव गच्छत्वं मम तेजोऽशसंभवम्।।

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनाचा स्थायीभाव देशभक्ति व स्वातंत्र्य-लालसा आंहे त्यांचें राजकारण समाजकारण लेखन वक्तृत्व आदि सर्व गोष्टी केवळ याच ध्येयानें प्रेरित होअून अुद्‌भवलेल्या आहेत. वरिलपैकीं कोणतेंही कृत्य घेतलें तरी तें इतकें स्वयंभू तेजस्वी व प्रभावी आहे कीं श्रीकृष्णानें भगवत गीतेंत अर्जुनास सांगितल्याप्रमाणें ते त्यांच्याच तेजाचें अंश आहेत यांत शंका नाहीं.

REFBK-0008525

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.,

## पुणें

= "निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु" म्हणजेच =

— हातीं घ्याल तें तडीस न्या —

शिक्षण प्रसारक मंडळी, पुणें.

अेक हजार टनांची नवीन मशिनरी, वार्षिक अेक लक्ष पोत्यांपेक्षां जास्त पोती साखरेचें अुत्पादन व भागीदारांना कायमचा

## १० टक्के नफा

हें कार्य तडीस गेलें. आतां पुढील हंगामांत स्पिरिट उत्पादनाचें कार्य तडीस जाअील ठेवी परत करण्याचें कार्य चालू आहे.

| वर्ष | ठेवीची रक्कम |
|---|---|
| ३०-९-१९५१ अखेर | रु. १,०२,९९,१५० |
| ३०-९-१९५२ अखेर | ,, ९६,३१,३०० |
| ३०-९-१९५३ अखेर | ,, ७३,३५,४०१ |
| ३०-९-१९५४ अखेर | ,, ५७,५९,३९१ |
| २५-६-१९५५ अखेर | ,, ४२,९२,३६६ |

ता. २६ जून १९५५ च्या वार्षिक सभेत भागीदारांनीं संचालकांचा अहवाल, ताळेबंद, नफातोटा पत्रक मंजूर करून

प्रेफरन्स शेअरवर ५ टक्के व ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के

नफा देण्याचा ठराव मंजूर केला

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८० सदाशिव पेठ, लक्ष्मी पथ, पुणें २.
दि. २६ जून १९५५

चंद्रशेखर गोविंद आगाशे
मॅनेजिंग एजण्ट्स्.